**JAYDEEP B. KULKARNI**
B.E. (Civil), MIE, FIV
Chartered Engineer & Approved Valuer
**Office :** Shop No. 1, Runanubandh Renuka, Prof. Colony Chowk, Savedi, Ahmednagar - 414003. | Mo. : 9822049099
**Resi. :** "Shubham", Suyog Grih Mandal, Neal Prof. Colony, Savedi, Ahmednagar - 414 003
Tel. : (0241) 2422459

RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

**सोनेतारण कर्ज**
फक्त १० मिनीटात रू.३५०००/-*
मुदत ठेव१३ महिने १०%
१० ग्रॅमसाठी
दामदुप्पट ९० महिने
**कैलास नागरी सहकारी पतसंस्था मर्या.**
मुख्य कार्यालय : श्रीरंग अपार्टमेंट, स्वामी विवेकानंद चौक, शनि मंदिरासमोर, अहमदनगर. फोन-०२४१ २३४५९८३
E mail : kailasnagari@ gmail.com
* अटी लागू

Volume - 72 | Issue- 207 | Marathi Daily | Wednesday 24/4/2024 | Pages - 6 | Price- Rs. 3

अग्रलेख: रोजगाराच्या समस्येचे वास्तव पान २



महावीर जयंतीनिमित्त केडगावमध्ये शोभायात्रा पान ५



आरोग्य सेवेचा नंदादीप सदैव तेवत राहील- डॉ. जाधव पान ६

## उठाठेव

– विवेक मेहेत्रे



साहेब... तुम्ही बहुतेक कागद बदललाय! इथे स्कायवॉक, मोनोरेल, इंटरनेटचं ब्रॉडबॅन्ड कनेक्शन अशी आश्वासनं काय देताय? इथे पाणी, वीज, पूल, रेल्वे स्टेशन देण्याची घोषणा करायचीय!


### झटपट पैसे कमविण्याच्या लोभाने तरुणाई विळख्यात

# नगरमध्ये आयपीएल सट्टाबाजार जोमात

**समाचार/नगर-दि.२४**

सध्या पूर्ण देशभर आयपीएल क्रिकेट स्पर्धेचा हंगाम सुरू आहे. नगर शहरात मागील काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात आयपीएल वर सट्टा लावला जात असून त्यावर मोठी उलाढाल होत आहे. हा सट्टा बेकायदेशीर असून झटपट पैसे कमविण्याच्या लोभाने अनेकजण यात बळी पडत आहेत. या सट्टा बाजारात १८ ते २५ वयोगटातील तरुण मुलांची संख्या सर्वात जास्त आहे हे विशेष. कालच पोलिसांच्या गुन्हे शाखेने चितळे रस्ता येथे केलेल्या कारवाईत तोफखान्यातील एका बुकीला पकडले आहे.

गेल्या काही काळापासून नगरमध्ये बिंगो लॉटरी, गुटखा सारख्या अवैध धंद्यांचे पेव फुटले असून त्यामध्ये आयपीएल सटट्याची भर पडली आहे. तरुण मुलांमधे झटपट पैसे कमावण्याचे मोठे आकर्षण निर्माण झाले आहे. त्याला कारण त्यांची बदललेली जीवनशैली आहे. महागडे मोबाईल फोन, घड्याळ, गाड्या, सततचे हॉटेलिंग या त्यांच्या सवयींमुळे लहान वयातच त्यांना पैशाची मोठी



> किशोरवयातील मुलांकडे पालकांनी बारकाईने लक्ष देणे आता काळाची गरज आहे. मुलांची बदललेली जीवनशैली, त्यांच्याकडे असणाऱ्या चैनीच्या वस्तू याबाबत पालकांनी सजग राहून वेळीच त्याची खातरजमा केल्यास भविष्यातील अनेक धोके टाळले जाऊ शकतात.

गरज भासते. त्यामुळे विद्यार्थी दशेतच त्यांना पैसे कमावण्याचे वेध लागतात. या आयपीएल सट्टा खेळणाऱ्यांमध्ये श्रीमंतांपासून सर्वसामान्य घरातील मुलांचा देखील समावेश आहे. आयपीएल सट्ट्यात झालेल्या नुकसानीमुळे अनेक कुटुंब आर्थिक अडचणीत देखील आलेले आहेत. मुलांकडे उपजीविकेचे काहीही साधन नसल्याने त्यांनी केलेले नुकसान हे पालकांना भरून द्यावे लागते. त्यासाठी स्थावर संपत्ती विकाव्या लागल्याच्या काही घटना देखील मागील काळात घडलेल्या आहेत.

हा सट्टा मोबाईल फोनवरूनच खेळला जातो. बुकिंकडूनच सट्टा खेळणाऱ्यांना एक स्वतंत्र प्रणाली (ॲप्लिकेशन्स) उपलब्ध करून त्यामध्ये काही रकमेचा बॅलन्स उपलब्ध करून दिला जातो. साधारणपणे दर आठवड्याला त्याचा हिशेब करून हार-जीत प्रमाणे खेळणाऱ्यांना पैसे मिळतात किंवा नुकसान झाल्यास तेवढे पैसे बुकिंना द्यावे लागतात. अर्थात हे व्यवहार रोख स्वरूपातच होतात. आयपीएल स्पर्धेतील सामने रोमहर्षक असतात. त्यातील प्रतयेक चेंडूगणिक सामन्याची परिस्थिती बदलत असते. त्यामुळे एका चेंडूवरील निर्णयापासून तर सामन्याच्या मुख्य निणर्यापर्यंत वेगवेगळ्या टप्प्यांवर पैसे लावले जातात. लावलेल्या पैशांना ५० ते १०० पट इतकी रक्कम जिंकता येते. त्याचप्रमाणे नुकसानही तसेच होते. झालेले नुकसान भरून काढण्यासाठी बुकिंकडून सक्तीची कारवाई करत त्यावर पठाणी व्याज आकारणी देखील केली जाते. **(पान ३ वर)**

## गुलाबी चंद्रदर्शन



आज (बधुवार) पहाटेच्या सुमारास आकाशात गुलाबी चंद्राचे दर्शन घडले. नयनरम्य पिंक मून किंवा सुपर मूनचे अनेकजण साक्षीदार बनले. **(छाया- देविप्रसाद अय्यंगार)** **(सविस्तर वृत्त पान ३ वर)**

## निवडक

### वोडाफोन, आयडिया शेअर्सची दोन दिवसात नोंदणी

नगर/समाचार, दि.२४- नुकताच वोडाफोन आयडियाने भांडवल बाजारात सर्वात मोठा म्हणजे १८००० कोटीचे शेअर्स भांडवल विक्रीला काढले होते. त्याला रिटेल कॅटॅगिरीमध्ये म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नसला तरी रिटेल कॅटॅगिरीचा कोटा पूर्ण झाला. परंतु टोटल कॅटॅगिरीमध्ये भरणा जवळ जवळ सात पट झाला. सोमवार दि. २२ रोजी इशू बंद झाला. रिटेल कॅटॅगिरीमध्ये मागेल त्याला संपूर्ण क्वांटीटी ११ रुपये भावाने देण्यात आली. मात्र इतरांना काटछाट करावी लागली. ११ रुपये भावाने दिलेल्या शेअर्सचा भाव आज १३:२५ ते १४ च्या दरम्यान घेतला. मात्र कंपनीने नव्याने दिलेल्या शेअर्सची नोंदणी केवळ २ दिवसात नेशन स्टॉक एक्सचेंज आणि मुंबई शेअर बाजारात केली असून उद्या या शेअर्सचा व्यवहार चालू होत आहे, अशी माहिती नगरचे शेअर ब्रोकर तुषार पटवा यांनी दिली.

### सुरतचा काँग्रेस उमेदवार चार दिवसांपासून बेपत्ता

**सुरत, दि. २४-** गुजरातमधील सुरत लोकसभा मतदारसंघात बिनविरोध लढत झाल्याने सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. इंडिया आघाडीच्या उमेदवाराचा अर्ज बाद ठरला तर अन्य उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने भाजपाचा उमेदवार जिंकला आहे. परंतु यामागे काहीतरी काळेबेरे असल्याचा संशय आपला आला आहे. काँग्रेस उमेदवार नीलेश कुंभाणी हे गेल्या चार दिवसांपासून बेपत्ता असून तो सापडत नसल्याने या बिनविरोध प्रकरणाविरोधात संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. कुंभाणी यांचा अर्ज रद्द झाल्याने काँग्रेसचे नेते, कार्यकर्ते सावरू शकलेले नाहीत. तर आपने कुंभाणी यांच्याविरोधात मोर्चा उघडला आहे. आपने सुरतच्या जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रार करत या गैरप्रकाराची चौकशी करण्याची मागणी केली आहे. सुरतचे जिल्हाधिकारी सौरभ पारघी यांच्याकडे ही तक्रार करण्यात आली आहे. या प्रकरणाने वातावरण तापविताच मुख्य निवडणूक अधिकारी पी. भारती यांनी याचा अहवाल मागविला आहे. यानुसार पुढील कारवाई केली जाईल असे त्यांनी म्हटले आहे.

# गिरीश जाधव यांच्या अर्जाने महाविकास आघाडीत अस्वस्थता



**समाचार/नगर-दि.२४**

शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हा प्रमुख गिरीश जाधव यांनी काल (मंगळवार) अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. गिरीश जाधव यांच्या उमेदवारी अर्जामुळे महाविकास आघाडीत अस्वस्थता पसरली आहे. महाविकास आघाडीकडून शरद पवार गटाचे नीलेश लंके यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यानंतर जाधव यांनीही उमेदवारी अर्ज भरला. त्यामुळे लंके यांच्या गोटात खळबळ उडाली आहे. गिरीश जाधव यांच्या उमेदवारी अर्जाने महाविकास आघाडीमध्ये चर्चा सुरू झाली आहे. गिरीश जाधव हे काय निर्णय घेतात याकडे महाविकास आघाडीचे लक्ष लागले आहे.

### कचरा टाकणाऱ्यांवर कारवाईकडे दुर्लक्ष

# स्वच्छता निरीक्षकांना बजावली नोटीस

**समाचार/नगर-दि.२४**

शहरातील साफसफाई, बाजारपेठा, चौपाटी परिसरात कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई, ॲनिमल वेस्ट टाकणाऱ्यांवर सूचना देऊनही कारवाई न केल्याने उपायुक्तांनी मुख्य स्वच्छता निरीक्षक व स्वच्छता निरीक्षकांना नोटीसा बजावल्या आहेत.



प्रशासकांनी दिलेल्या आदेशानुसार उपाययोजना करून केलेल्या कामाचा अहवाल प्रभाग अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने सादर करण्याचे आदेश उपायुक्तांनी दिले आहेत. बाजारपेठ, व्यापारी क्षेत्रात उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करणे, खाऊगल्ली, चौपाटी परिसरातील खाद्यपदार्थ विक्रेत्यांना ओला व सुका कचरा वर्गीकरण करून कचरा पेटीत टाकून कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये टाकण्यास सक्ती करणे, पाडकाम साहित्य तसेच बांधकाम साहित्य रस्त्यावर टाकून रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करणे, रस्त्यावर टाकण्यात आलेल्या झाडांच्या फांद्या उचलणे, सार्वजनिक ठिकाणी ॲनिमल वेस्ट टाकणाऱ्या चिकन, मटन व्यावसायिकांवर कारवाई, कार सजावटसाठी वापरल्या जाणाऱ्या उपकरणांचे थर्माकोलचे वेष्टन उघड्या गटारी व नाल्यांमध्ये टाकले जाते, अशा व्यावसायिकांवर कारवाई करण्याचे आदेश प्रशासकांनी दिले होते. मात्र, गेल्या आठवडाभरात याबाबत कोणतीही प्रभावी कारवाई केली नाही. त्यामुळे सदर **(पान ३ वर)**

### कोतवाली पोलिसांची कारवाई; सहा दुचाकी हस्तगत

# शहरातून मोटारसायकल चोरणारा जेरबंद



**समाचार/नगर-दि.२४**

नगर शहरातून सहा दुचाकीचोरी करणारा कोतवाली पोलिसांनी जेरबंद केला. नितीन दत्तात्रय नवघरे (वय १९, रा. रेणुकावाडी, मिरी, ता. पाथर्डी) असे त्याचे नाव आहे.

ही कारवाई पोलिस निरीक्षक राजेंद्र दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक योगिता कोकाटे, उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, पोहेकॉ शाहीद शेख, योगेश भिंगारदिवे, ए.पी. एनामदार, संदीप पितळे, पोना अविनाश वाकचौरे, संगिता बडे, पोकॉ अभय कदम, प्रमोद लहारे, दीपक रोहोकले, सत्यजीत शिंदे, तानाजी पवार, सुरज कदम, अमोल गाडे, सुजय हिवाळे, शिवाजी मोरे, सचिन लोळगे यांनी केली. महावितरण कार्यालयासमोरून दुचाकी चोरी गेल्याप्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करताना पोनि दराडे यांना माहिती मिळाली की, सदर गुन्ह्यातील दुचाकीचोर **(पान ३ वर)**

## ऑनलाईन सट्टा घेणाऱ्या तरूणावर पोलिसांची कारवाई

**समाचार/नगर-दि.२४**

आयपीएल मॅचवर ऑनलाईन सट्टा घेणाऱ्या तरूणाला कोतवाली पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने पकडले. महेश मनोहर दुडगु (वय ३२, रा. चितळे रस्ता, तोफखाना, नगर) असे त्याचे नाव आहे.

त्याच्याविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्याकडून रोकड, मोबाईल, असा १२ हजार ६७० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाच्या सहायक पोलीस निरीक्षक योगीता कोकाटे, पोलीस अंमलदार शाहीद शेख, इनामदार, दीपक रोहकले, तानाजी पवार, सुजय हिवाळे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## जुन्या पिढीतील ज्येष्ठ पत्रकार स.म. कुलकर्णी यांचे निधन



**समाचार/नगर-दि.२४**

कोपरगाव येथील रहिवासी आणि जिल्ह्यातील जुन्या काळातील ज्येष्ठ पत्रकार सदाशिव महिपती उर्फ स.म.कुलकर्णी यांचे आज वृध्दापकाळाने निधन झाले. ते ९० वर्षांचे होते.

जलसंपदा विभागात मोजणीदार म्हणून नोकरीस असणाऱ्या कुलकर्णी यांनी लोकसत्ता, इंडियन एक्सप्रेस, टाईम्स ऑफ इंडिया यासारख्या वर्तमानपत्रातून जवळपास साडेपाच दशके पत्रकारिता केली. इंग्रजी भाषेची उत्तम जाण व संभाषण कौशल्य त्यांना अवगत होते. जिल्ह्यातील प्रश्नांचा तसेच राजकारणाचा त्यांचा मोठा अभ्यास होता. शंकरराव काळे आणि शंकरराव कोल्हे या ज्येष्ठ नेत्यांच्या राजकीय कारकिर्दीचे ते साक्षीदार होते. तीस वर्षांपूर्वी स.म. कुलकर्णी यांनी सक्रिय **(पान ३ वर)**

# दुष्काळातही महाराष्ट्रात साखर उत्पादन जादा

**समाचार/नगर-दि.२४**

कर्नाटकमधील कमी उत्पादनामुळे चालू हंगामात १५ एप्रिलपर्यंत देशातील साखरेचे उत्पादन ३ कोटी १० लाख टन झाले आहे. दुष्काळी परिस्थिती असतानाही महाराष्ट्राने सर्वांचे अंदाज चुकवून १ कोटी ९ लाख टन साखर उत्पादन केले आहे.

भारत हा जगातील प्रमुख साखर उत्पादक देश आहे. साखरेचा हंगाम ऑक्टोबरपासून वेगात चालतो. लोकसभा निवडणुकीच्या काळात साखरेचे भाव वाढू नयेत, म्हणून केंद्र सरकारने साखर निर्यातीवर बंदी घातली आहे. इंडियन शुगर मिल्स असोसिएशनने (इस्मा) २०२३-२४ या हंगामासाठी निव्वळ साखर उत्पादन अंदाज सुधारून ३ कोटी २० लाख टन केला आहे. इस्माच्या ताज्या आकडेवारीनुसार, देशातील आघाडीचे साखर उत्पादक राज्य महाराष्ट्रात चालू हंगामाच्या १५ एप्रिलपर्यंत साखरेचे उत्पादनएक कोटी नऊ लाख टनांपेक्षा जास्त होते. गेल्या वर्षी याच काळात ते १ कोटी ५ लाख टन झाले होते.



उत्तर प्रदेश हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे साखर उत्पादक राज्य आहे. या राज्यातही साखर उत्पादन ९० लाख ६७ हजार टनांवरून एक कोटी एक हजार टन इतके वाढले आहे. तथापि, देशातील कर्नाटक या तिसऱ्या मोठ्या साखर उत्पादक राज्यात १५ एप्रिलपर्यंत ५० लाख ६ हजार टन इतके साखर उत्पादन झाले. गेल्या वर्षी ते ५० लाख ४९ हजार टन होते. या कालावधीत गुजरात आणि तामिळनाडू या दोन्ही ठिकाणी साखरेचे उत्पादन अनुक्रमे ९ लाख १९ हजार टन आणि ८ लाख ६० हजार टनांवर आले. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा एप्रिलच्या पहिल्या पंधरवड्यात साखर कारखाने बंद होण्याचा वेग अधिक असल्याचे इस्माने म्हटले आहे. चालू हंगामात सुमारे १२८ कारखान्यांनी १५ एप्रिलपर्यंत कामकाज बंद केले तर गेल्या वर्षी याच काळात ५५ कारखाने बंद झाले होते. देशभरात एकूण ४४८ कारखान्यांनी गाळप पूर्ण केले आहे तर गेल्या वर्षी एप्रिलच्या मध्यापर्यंत ४०१ कारखाने बंद होते.

संपादकीय

# रोजगाराच्या समस्येचे वास्तव

गेल्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान भाजपाने लोकांना नोकऱ्या देण्याबाबत अनेक आश्वासने दिली होती. एवढेच नाही, तर केंद्र सरकारने तरुणांमध्ये कौशल्य वाढवण्यासाठी अनेक योजना सुरू केल्या होत्या; परंतु आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या ताज्या अहवालानुसार, सध्या भारतातील सुमारे ८३ टक्के तरुण बेरोजगार आहेत. भारतीय अर्थव्यवस्था जगात सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जात असली, तरी अर्थव्यवस्था वाढत असताना रोजगार का वाढत नाहीत, हा प्रश्न अनुत्तरीत राहतो. सर्व योजना आणि प्रयत्न करूनही देशात बेरोजगारी का कमी होत नाही, असा प्रश्न उपस्थित होतो. लोकांना कौशल्य शिकवण्यासाठी केंद्र सरकारने या योजनांवर किती खर्च केला या प्रश्नाचे उत्तर पाहिले, तर हा खर्च पाण्यात गेला का, असा सवाल त्या निमित्ताने विचारला जातो. अर्थात राज्यसभेच्या अहवालानुसार, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेंतर्गत कौशल्य शिकणारे तरुण इतर योजनांच्या तुलनेत जास्त पगारासह नोकऱ्या मिळवू शकतात. या सरकारी योजनांचा भाग असलेल्या तरुणांपैकी सुमारे ७६ टक्के उमेदवारांनी कबूल केले की प्रशिक्षणानंतर त्यांना पूर्वीपेक्षा अधिक रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत. असे असले तरी इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन आणि इन्स्टिट्यूट फॉर ह्युमन डेव्हलपमेंट (आयएचडी)च्या २०२४ च्या अहवालात भारतातील बेरोजगारीबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली आहे. अहवालानुसार देशातील सुशिक्षित तरुणांमध्ये बेरोजगारीचा टक्का वाढला आहे.देशात माध्यमिक शिक्षणानंतर शाळा सोडणाऱ्या तरुणांच्या संख्येतही गेल्या काही वर्षांमध्ये वाढ झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. ही वाढती संख्या विशेषतः गरीब राज्यांमध्ये आणि उपेक्षित गटांमध्ये दिसून आली आहे. उच्च शिक्षणात वाढती नोंदणी असूनही गुणवत्तेची चिंता कायम आहे. बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे, पगार कमी होत आहेत. २०१९ पासून भारतात नियमित कामगार आणि स्वयंरोजगार करणाऱ्यांच्या पगारात घट होत असल्याचे दिसून आले आहे. एवढेच नाही तर, अकुशल कामगार दलातील कॅज्युअल कामगारांनाही २०२२ पासून किमान वेतन मिळालेले नाही. अहवालानुसार, बिहार, उत्तर प्रदेश, ओडिशा, मध्य प्रदेश, झारखंड आणि छत्तीसगड या राज्यांमध्ये रोजगाराची स्थिती अत्यंत दयनीय आहे. २०२३ मध्ये महिलांमधील बेरोजगारीचा दर तीन टक्के होता. २०२२ मध्ये तो ३.३ टक्के तर २०२१ मध्ये ३.४ टक्के होता. त्याच वेळी, पुरुषांमधील बेरोजगारीचा दर २०२३ मध्ये ३.२ टक्के नोंदवला गेला, जो २०२२ मधील ३.७ टक्के आणि २०२१ मधील ४.५ टक्क्यांपेक्षा खूपच कमी आहे.२०२३ मध्ये शहरी भागातील बेरोजगारीचा दर ५.२ टक्के नोंदवला गेला तर २०२२ मध्ये हा दर ५.७ टक्के आणि २०२१ मध्ये ६.५ टक्के होता. आपण ग्रामीण भागाबद्दल बोललो तर २०२१ मध्ये बेरोजगारीचा दर ३.३ टक्के होता तर २०२२ मध्ये २.८ टक्के आणि २०२३ ममत कामगार आणि स्वयंरोजगार करणाऱ्यांच्या पगारात घट होत असल्याचे दिसून आले आहे. एवढेच नाही तर, अकुशल कामगार दलातील कॅज्युअल कामगारांनाही २०२२ पासून किमान वेतन मिळालेले नाही. अहवालानुसार, बिहार, उत्तर प्रदेश, ओडिशा, मध्य प्रदेश, झारखंड आणि छत्तीसगड या राज्यांमध्ये रोजगाराची स्थिती अत्यंत दयनीय आहे. २०२३ मध्ये महिलांमधील बेरोजगारीचा दर तीन टक्के होता. २०२२ मध्ये तो ३.३ टक्के तर २०२१ मध्ये ३.४ टक्के होता. त्याच वेळी, पुरुषांमधील बेरोजगारीचा दर २०२३ मध्ये ३.२ टक्के नोंदवध्ये केवळ २.४ टक्के इतका कमी झाला. भारतात आतापर्यंत एक कोटी ४० लाख तरुणांनी कौशल्य विकास धोरणांतर्गत प्रशिक्षण घेतले आहे. ५४ लाख तरुणांना अपस्किलिंग आणि रिस्किलिंगचा लाभ मिळाला. म्हणजे ५४ लाख तरुणांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात चांगली कौशल्ये मिळवली किंवा नवी कौशल्ये शिकली. जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांच्या तुलनेत भारत ही अधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत सर्व काही ठीक असल्याचे सूचित करतात; पण इंग्रजीत द डेव्हिल लाईज इन द डिटेल्स अशी एक म्हण आहे. या प्रकरणातही अशीच परिस्थिती दिसते.सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी (सीएमआई) ही संस्था आर्थिक बाबींवर अहवाल आणि आकडेवारी प्रकाशित करते. तिने दिलेल्या माहितीनुसार ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ दरम्यान, २०-२४ वयोगटातील ४४.३ टक्के तरुण बेरोजगार होते आणि २५-२९ वयोगटातील बेरोजगारीचा दर १४ टक्क्यांपेक्षा जास्त होता. एकीकडे बेरोजगारीमुळे युवक आंदोलन करत आहेत तर दुसरीकडे सरकार त्यांच्या कर्तृत्वाचे ढोल वाजवत आहे. अर्थशास्त्राच्या भाषेत बेरोजगारी म्हणजे अशी परिस्थिती जेव्हा कामगार दलातील एखादी व्यक्ती रोजगाराच्या शोधात असते, रोजगारक्षम असते; परंतु रोजगार मिळत नाही. यावरून बेरोजगारीचा दर म्हणजे कामगारवर्गातील बेरोजगारांची टक्केवारी. बेरोजगारीचा दर ही कोणत्याही अर्थव्यवस्थेतील एक मोठी समस्या असते; परंतु भारताच्या बाबतीत खरी समस्या बेरोजगारीच्या दरापासून सुरू होत नाही तर श्रमशक्तीपासून सुरू होते. जगातील सर्वात तरुण देश असूनही आपण श्रमशक्तीच्या सहभागाच्या बाबतीत अनेक देशांच्या मागे आहोत. जागतिक बँकेच्या मते, २०२२ मध्ये बांगलादेश, जपान, ऑस्ट्रेलिया, ब्राझीलसारखे देश आपल्या पुढे होते. बांगलादेशमध्ये श्रमशक्तीचा सहभाग दर ५९ टक्के, जपानमध्ये ६२ टक्के, ऑस्ट्रेलियामध्ये ६६ टक्के आणि ब्राझीलमध्ये ६३ टक्के होता.

# जागतिक पुस्तकदिनी मुले रमली पुस्तकांच्या विश्वात



**समाचार/नगर-दि.२४**

सोशल मिडियाच्या 'स्कोरलिंग' जगात बोटे मोबाईलवर सराईतपणे फिरणारी बोटे चक्क पुस्तकांच्या पानावरुन फिरत होती. औचित्य होते, जागतिक पुस्तक दिनानिमित्त अहमदनगर जिल्हा वाचनालय व रोटरी क्लब -२ ऑफ एम्पॉयरिंग युथच्यावतीने आयोजित कार्यक्रमाचे.

जिल्हा वाचनालयातच्यावतीने आयोजित या कार्यक्रमप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते महान लेखक विल्यम शेक्सपियर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून 'माणुसकीची शाळा' चळवळीचे प्रणेते शिवाजी नाईकवाडी, अध्यक्ष प्रा.शिरिष मोडक, उपाध्यक्ष दिलीप पांढरे, रोटरीच्या समन्वयक डॉ.बिंदू शिरसाठ, खजिनदार तन्वीर खान, संचालिका प्रा.मेधा काळे, प्रा.ज्योती कुलकर्णी, कवी चंद्रकांत पालवे, ग्रंथपाल अमोल इथापे, नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल, वाचक अविनाश रसाळ, संतोष जाधव उपस्थित होते.

प्रास्तविक प्रा.शिरिष मोडक यांनी केले. शिवाजी नाईकवाडी यांनी मुलांशी मनोरंजकपणे सुसंवाद साधतांना वाचन व संस्कार हे आयुष्याला कसे घडवितात, यावर भाष्य केले. यावेळी सुमारे १२० मुलांना विविधध विषयीवरचे बालसाहित्य भेट देण्यात आले.

# आहारतज्ञ डॉ. माधुरी ठोंबरे यांची 'सह्याद्री'वर मुलाखत

**समाचार/नगर-दि.२४**

गुलमोहोर रोड येथील साईराम न्युट्रीकेअरच्या संचालिका आहारतज्ञ डॉ.माधुरी ठोंबरे यांची सह्याद्री वाहिनीवर सखी सह्याद्री कार्यक्रमात दि.२५ रोजी दु. १२ वा. व पुन:प्रक्षेपण रात्री ११ वा. तसेच दि.२६ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ९ वा. मुलाखत होणार आहे.



दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरील प्रक्षेपित होणार्या मुलाखतीमध्ये डॉ.माधुरी ठोंबरे या महिलांना मानसिक, शारीरिक व वाढत्या ताणतणावात आहार कसा घ्यावा, पोषक आहाराबाबत मार्गदर्शन करणार आहेत. दूरदर्शनच्या सूत्रसंचालिका चैताली कानिटकर यांच्या सोबत थेट मुलाखत प्रेक्षेपण केले जाणार आहे.

तरी या मुलाखतीच्या श्रवणाचा लाभ घेऊन महिलांनी आपल्या समस्या फोनवर सांगाव्यात, त्याचे निराकरण करण्यात येईल, असे डॉ. ठोंबरे यांनी सांगितले.

# वसंत चित्र महल

नगरमधील सर्व प्रकारच्या सिनेरसिकांचे लाडके थिएटर 'वसंत चित्र महल' हिंदी, मराठी, इंग्रजी तसेच डब केलेले असे सर्व प्रकारचे चित्रपट दाखवणारे एकमेव 'वसंत' अगदी आबाल वृध्दापासून ते उशिरा रात्री ११।। च्या शोला फुल्ल गर्दी करणाऱ्या रंगेल रसिकांपर्यंत सर्वांची फिल्मी हौस वसंतने अनेक दशके पूर्ण केली. सर्व प्रकारच्या प्रेक्षकांची गर्दी खेचण्याची कला वसंतचे मालक के.के. बाबा यांच्याकडे होती.

नगरमध्ये इतर कोणत्याही टॉकीजमध्ये इंग्रजी चित्रपट कधीही लावले नाही. पण वसंतने हॉलिवूडचे सिनेमे. कधी मॉर्निंग शो, लेट नाईट शो आणि एवढंच नव्हे तर अगदी रेग्यूलर शो म्हणून इंग्रजी चित्रपट वर्षानुवर्षे दाखवले. दर रविवारी सकाळी ९ वाजता स्पेशल मॉर्निंग शो वसंतला असायचा. टेरेन्स हिल्स, बड स्पेन्झर जोडीचे ॲक्शन कॉमेडी चित्रपट, ॲन्थनी क्वीन, चार्लस ब्रॉन्सन, इ. सुपरहिरोंचे टेक्सास सिनेमे, जेम्स बॉण्ड सिरीज वगैरे असंख्य प्रकारचे इंग्रजी चित्रपट पाहण्याची संधी नगरकरांना दिली ती वसंतच्या स्पेशल 'मॉर्निंग शो'ने. या मॉर्निंग मॅटिनीला येणारे प्रेक्षक हे ठरलेले असायचे. दर रविवारी त्यांची भेट होणार म्हणजे होणारच. या संडे स्पेशलने प्रेक्षकांना एक वेगळाच आनंद दिला.

मॉर्निंग शो प्रमाणेच वसंतने लेट नाईट शो (रात्री ११।। नंतर) हा एक वेगळाच प्रयोग सुरू केला. काहीही म्हणा, थोड्या फार प्रमाणात जरा चावटपणा पुरुषांना आवडतोच आणि ही आवड लक्षात घेऊन हॉलिवूडचे खास रोमॅन्टिक चित्रपट दाखवायला सुरुवात झाली. पहिला लेट नाईट शो बहुधा टेक्सेस डी टूर असावा, त्यानंतर Blue Lagoon या चित्रपटांमुळे पब्लिक नियमितपणे जागरण करु लागली. इतकी गर्दी की तिकिटांचा ब्लॅक व्हायचा. गुलाबी सिनेमांनी लोकांच्या झोपा उडाल्या... असो. तर, याला म्हणतात प्रेक्षक आकर्षित करण्याची कला.

वसंतने काही वर्षे रेग्युलर शो टाईम मध्येही इंग्रजी चित्रपटांची सिरीज दाखवली. एकापेक्षा एक सुपर ड्युपर हिट प्लस हॉलीवूड फिल्मस् नगरमध्ये पहायला मिळणे हे शौकिनांच्या दृष्टीने मेजवानी होती. जगभर गाजलेले व ऑस्कर विनर चित्रपट उदा. रोमन हॉलिडेज कम सप्टेंबर, मेकॅनाज् गोल्ड, आइस स्टेशन झिब्रा, गन्स ऑफ नेव्हरॉन, टॉवरिंग इन्फेर्नो इ. असंख्य चित्रपट केवळ वसंत कृपेने पहायला मिळाले. अन्यथा असे चित्रपट पाहण्यासाठी खास पुण्याला जावे लागत असे. बायबल कथांवर आधारित बेनहर, द टेन कमांडमेंटस् सॅम्सन ॲण्ड डिलायला, हर्क्युलिस हे प्रचंड सेटस् व भव्य असे चित्रपट इथेच पाहिले. त्याचप्रमाणे ऑल्फ्रेड हिचकॉकच्या मर्डर मिस्ट्रीची सिरीज, ड्रॅक्यूला सिरीज असे कितीतरी अविस्मरणीय चित्रपटांच्या आठवणी अजूनही रसिकांच्या स्मरणात असतील. लॉरेल हार्डी, चार्ली चॅप्लिन, थ्री स्टूजेसच्या सिरीजने सर्वांना धमाल हसवलं ते इथं. इंग्रजी डायलॉग कळले नाही तरी पब्लिकला सिनेमाची स्टोरी चांगली कळायची. सिनेमा पाहताना भाषेची अडचण आली तर तो सिनेमा काढणाऱ्या दिग्दर्शकाचा पराभव आहे. असं सत्यजित राय म्हणतात. असो!

'पती पत्नी' हा हिंदी सिनेमा वसंतला आला होता. त्यात चार विवाहित जोड्यांची मजेदार कथा होती. पण म्हणावी तशी गर्दी जमेना. तेव्हा वसंतच्या मॅनेजरने एक आयडिया लढवली. पेपरमध्ये जाहिरात दिली. 'पती पत्नी' चित्रपट 'जोडीला' एकाच तिकीटात पाहण्याची संधी आणि ही कल्पना एकदम यशस्वी ठरली. बहुधा 'मेरे लाल' या चित्रपटाच्या वेळी पालकांबरोबर एक 'लाल' फ्री! असाही एक प्रयोग केला होता.

वसंत आणखी एक खासियत म्हणजे 'वन्समोअर' एखाद्या सिनेमातलं भन्नाट गाणं पब्लिकला आवडलं की मग जोरजोरात शिट्ट्या. ऑपरेटरला बरोबर कळायचं की या गाण्याला पब्लिकचा 'वन्समोअर'. तो फिल्म रिवाइंड करुन पुन्हा तेच गाणं दाखवायचा. असा 'वन्समोअर' जगातल्या कुठल्याही ठिकाणी झाला असणे किंवा होणे अशक्य. ओन्ली वसंत.

वसंतला फुल्ल गर्दीत तिकीट काढण्यासाठी पैलवानी ताकद पाहिजे. एखादा तरुण पोरगा तिकीट ऑफीसच्या भोवती जमलेल्या गर्दीच्या अंगावर थेट उडी मारुन पोहत गेल्यासारखा तिकीट खिडकीपर्यंत जाऊन हात घुसवून, तिकीटांचा गड्डा घेऊन एखाद्या शूर वीराप्रमाणे बाजी मारुन जात असे. याला म्हणतात थ्रिल! असो. वसंतच्या रुपेरी भव्य पडदा काळाच्या पडद्याआड गेला. वसंत चित्र महल पाडून तिथे व्यावसायिक संकूल उभारलं. पण त्या रस्त्याने जाताना अजूनही ती गर्दी, तिथल्या गाडीवरील पालकाच्या भज्यांचा खमंग वास आणि असंख्य आठवणींचा गंध मनात रेंगाळतो तो बहरलेला 'वसंत' डोळ्यासमोर तरळू लागतो.

**- एजी. नगरवाला.**




## राशीभविष्य

- **मेष** : कार्याची दखल घेतली जाईल. आत्मविश्वास ढळू देऊ नका. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल.
- **वृषभ** : सरकारी कामं मार्गी लागतील. दिलासादायक घटना घडतील. मित्र-नातलगांचं सहकार्य मिळेल,
- **मिथुन** : नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. खर्चाचं प्रमाण वाढतं राहील. विवाहाचे प्रयत्न सफल होतील.
- **कर्क** : आर्थिक बाबतीत ताण राहील. कौटुंबिक वाद-विवाद संभवतात. नोकरीचे प्रयत्न सुरू ठेवावेत.
- **सिंह** : मोठे आर्थिक व्यवहार तुर्तास नको. चिंता वाढवणाऱ्या घटना संभवतात. विचारानं, संयमानं रहावं.
- **कन्या** : उपजत कला-गुणांचा विकास होईल. नव्या योजना मार्गी लागतील. व्यवसायात उत्कर्ष होईल.
- **तूळ** : अनुभवींचं मार्गदर्शन कामी येईल. प्रवास शक्यतो टाळावा. विद्यार्थ्यांच्या कलांना वाव मिळेल.
- **वृश्चिक** : भांवडांचं सौख्य लाभेल. कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल. खरेदीचे व्यवहार मनासारखे होतील.
- **धनु** : कामाचा ताण वाढेल. प्रापंचिक समस्या हैराण करतील. ज्येष्ठांच्या प्रकृतीची काळजी घ्यावी.
- **मकर** : व्यवहाराची बोलणी सफल होतील. आनंददायी घटना घडतील. नोकरीच्या प्रयत्नात यश येईल.
- **कुंभ** : कामं मार्गी लागतील. अनावश्यक खर्च टाळायला हवा. धार्मिक यात्रेचं समाधान लाभेल.
- **मीन** : अनपेक्षित घटना संभवतात. भागीदारी व्यवसायात काळजी घ्यावी. कुलदेवतेची उपासना करा.

## २५ एप्रिल

दिन विशेष

- २०१३ : रेल्वेच्या आगाऊ आरक्षणाची मुदत ६० दिवसांवर आणण्यात आली.
- २०१६ : विजय मल्ल्यांची खासदारकी रद्द केली पाहिजे, राज्यसभेच्या शिस्तपालन समितीचं मत.
- २०१७ : मालेगाव बॉंबस्फोटाच्या खटल्यातील आरोपी साध्वी प्रज्ञासिंहला जामीन मंजूर.
- २०१८ : आश्रमातील अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी जोधपूरमधील विशेष न्यायालयाने आसाराम बापूला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

महत्त्वपूर्ण काही

## लागवड औषधी वनस्पतींची

उन्हाचा प्रकोप वाढतोय तसा वेगवेगळ्या व्याधींचा प्रादुर्भावही वाढू लागला आहे. त्यामुळे औषधी वनस्पतींद्वारे आपण आपली प्रतिकारक्षमता वाढवू शकतो. घरच्या घरी या वनस्पतींची लागवड करता येईल. या वनस्पतींबाबत. ✻ थाई पदार्थांमध्ये लेमनग्रासचा वापर केला जातो. पण आपल्या पदार्थांमध्येही त्याचा खुबीने वापर करता येईल. लेमनग्रासमध्ये बॅक्टेरियांना अटकाव करण्याची क्षमता असते. तसंच यामुळे आपली प्रतिकारक्षमताही वाढते. ✻ कोरफडीचा गर त्वचाविकारांवर उपयुक्त ठरतो तसंच केसांच्या बळकटीसाठीही कोरफड वापरली जाते. कोरफडीचा रस प्यायल्याने प्रतिकारक्षमता वाढते. ✻ पार्सेली ही वनस्पती औषधी असते. पार्सेलीची पानं सॅलेड, सूप, ऑम्लेटसारख्या पदार्थांमध्ये घालता येतात. यात अँटी बॅक्टेरिअल घटक असतात. यामुळे श्वासाची दुर्गंधी दूर होते. तसंच प्रतिकारक्षमता वाढते. ✻ कांद्याची पातही गुणकारी असते. कांद्याच्या पातीची लागवड घरच्या घरी करता येईल. काही प्रकारच्या कर्करोगांना अटकाव करण्याची क्षमता यात असते. अशा औषधी वनस्पती तुम्ही घरीही लावू शकता.

आरोग्यमंत्र

## मुखदुर्गंधी घालवण्यासाठी...

कितीही स्वच्छता पाळली तरी तोंडाला दुर्गंधी येत असल्याची तक्रार अनेक जण करतात. समाजात वावरताना ही बाब न्यूनगंड निर्माण करणारी ठरत असल्याची त्यांची खंत असते. एकंदरच तोंडाची दुर्गंधी ही मोठी समस्या असते. अर्थात दातांची आणि तोंडाची योग्य पद्धतीने स्वच्छता राखली तर ही समस्या टाळता येते. बॅक्टेरियांच्या प्रादूर्भावामुळे तोंडाच्या दुर्गंधीची समस्या उत्पन्न होते. कॅविटिज तसंच हिरड्यांच्या विकारामुळेही तोंडाला दुर्गंधी येते. यापासून बचाव करण्याच्या पद्धतींविषयी...



✻ भरपूर पाणी प्या, खाल्ल्यानंतर चूळ भरा. पाण्यामुळे बॅक्टेरियांचं प्रमाण कमी होतं. सोडा, एनर्जी ड्रिंक, कोल्ड ड्रिंक अशा सायट्रिक ॲसिडयुक्त पेयांमुळे तोंडाची दुर्गंधी वाढते. त्यामुळे अशी पेयं टाळा.

✻ कमी कर्बोदकं असणारा आणि फॅट्स तसंच प्रथिनयुक्त आहार घ्या. आहारात हेल्दी कार्बस असू द्या. यामुळे शरीरातल्या फॅट्सचं प्रमाण नियंत्रणात राहतं आणि श्वासाची दुर्गंधी कमी होते.

✻ दररोज दोन वेळा दात घासा. जेवल्यानंतर दातांमध्ये अन्नकण अडकून बसतात. या अन्नकणांमुळे बॅक्टेरियांची वाढ होते आणि तोंडाला दुर्गंधी येते.

✻ अल्कोहोल फ्री माउथ वॉशचा वापर करा. बॅक्टेरियांमुळे आपलं तोंड कोरडं पडतं. त्यामुळे माउथवॉशचा नियमित वापर करा.

सल्ला मोलाचा

## कार ठेवा स्वच्छ

सुट्टीमध्ये भटकंतीचे बरेच बेत आखले जातात. अनेकांचा प्रवास कारनेच होतो. कारमध्ये कोणी बसलं आणि त्यांना सीटवर डाग किंवा घाण दिसली तर आपल्याला लाजल्यासारखं वाटतं. कारची स्वच्छता कशी करायची, याविषयी. ✻ कार सीटच्या स्वच्छतेसंदर्भात देण्यात आलेले निर्देश वाचून घ्या. कारच्या कुशन कव्हरसाठी कोणतं मटेरिअल वापरण्यात आलंय ते जाणून घ्या. त्यानुसारच केमिकल्सची निवड करा. काही कुशन कव्हर्स हातानी धुतली तरी चालू शकतात तर काही स्प्रे मारून स्वच्छ करावी लागतात. ✻ प्लास्टिक आणि धातूच्या भागांची स्वच्छता ओल्या कपड्यांनी करा. ब्लीच किंवा इतर रसायनांचा वापर करू नका. ब्लीचमुळे मेटेरियल खराब होण्याची शक्यता असते. ✻ एक्स्ट्रा लॉंग नोजल असलेले व्हॅक्युम क्लिनर निवडा. हे क्लिनर्स सीटच्या मध्येही जाऊ शकतात. ✻ कारची स्वच्छता करताना कार फ्लोअर कव्हर्स झटकून घ्या. या फ्लोअर्सखाली बरीच घाण साठलेली असते. ✻ एक्स्ट्रा लॉंग नोजल असलेले व्हॅक्युम क्लिनर निवडा. हे क्लिनर्स सीटच्या मध्येही जाऊ शकतात.

### पंचांग

**गुरुवार, २५ एप्रिल २०२४**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
चैत्र कृ. १, नक्षत्र : विशाखा
चंद्रराशी : तूळ, व्यतिपात योग
सूर्योदय: ०६.१६, सूर्यास्त: ६.५७

### फॉरवर्डस

**एखादी व्यक्ती सगळ्यांवरच गारुड घालते, नाही का?**

मंजिल भी उसकी थी, रास्ता भी उसका था
एक मैं ही अकेला था, बाकी सारा काफिला भी उसका था

### स्मार्ट शॉपिंग

सोफा आरामशीर असण्याबरोबरच टिकायला दणकट असायला हवा. या दृष्टीने त्याच्या स्प्रिंग्ज उत्तम दर्जाच्या आणि व्यवस्थित फीट केलेल्या असायला हव्या. हाताने आवळलेल्या आणि फिट केलेल्या म्हणजेच हॅंड टाईड स्प्रिंग्ज सोफ्याला वेगळीच मजबुती देतात असं या क्षेत्रातील तज्ज्ञ सांगतात. या सोफ्यांची किंमत थोडी जास्त असते, मात्र पुढचा बराच काळ सेवा देत असल्यामुळे अशा सोफ्याची खरेदी परवडते हे लक्षात घ्यायला हवं. फिक्नायनर सोफा सेटमध्ये अधिक आरामदायी बैठक मिळते. त्यामुळे बजेटमध्ये बसत असेल तर अशा प्रकारचा सोफा सेट घेण्यास प्राधान्य द्यावं.

करिअरवाटा

## औषधनिर्माणाच्या क्षेत्रात

विज्ञान शाखेत शिक्षण घेणाऱ्या अनेकांचा वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि आय.टी. क्षेत्राकडे ओढा असतो. परंतु त्यामानाने फार्मसीकडे जाणाऱ्यांची संख्या कमी असते. वास्तविक या शाखेतही कारकिर्दीच्या अनेक चांगल्या संधी निर्माण होऊ शकतात. फार्मसीला 'औषध निर्माण शास्त्र' म्हणतात. या शाखेचं शिक्षणही अतिशय महत्त्वाचं आहे. मात्र या क्षेत्राविषयी अनेकांना व्यापक प्रमाणात माहिती नसते. फार्मासिस्ट म्हणजे औषधाच्या दुकानात चिठ्ठ्या वाचून औषधं देणारे एवढ्यापर्यंतच सामान्य माणसाचं या विषयीचं ज्ञान मर्यादित आहे. बऱ्याच लोकांना यापलीकडे फार्मासिस्टची काही कामं असतात याचीही माहिती नसते. मात्र हे सगळे गैरसमज दूर सारायला हवेत. अन्य अभ्यासक्रमांना प्रवेश मिळाला नाही तर या अभ्यासक्रमाकडे वळण्याची मानसिकता बदलायला हवी. हा अतिशय महत्त्वाचा आणि खर्चिक असा अभ्यासक्रम आहे. त्याची उपयुक्तताही खूप मोठी आहे. डॉक्टरांच्या सांगण्याप्रमाणे औषधं तयार करणं, औषधांची मिश्रणं बनवणं ही कामंही फार्मासिस्ट करू शकतात. ही औषधे बनवताना त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या घटकांची माहिती त्यांना असते.



खेचाखेची

## त्राटक म्हणजे काय?

(ज्येष्ठ नागरिक संघात)

**कुलकर्णी:** माधवराव, हल्ली रोज संध्याकाळी मी त्राटक करतो. तुम्हीसुद्धा करत जा.

**माधवराव:** त्राटक? ते काय असतं?

**माधवराव:** संध्याकाळच्या वेळी खोलीमध्ये अंधार करायचा आणि समई किंवा मेणबत्ती लावून पापण्या न मिटता ज्योतीकडे टक लावून बघायचं. डोळ्यांना छान वाटतं.

**कुलकर्णी:** डोळ्यांना छान वाटेल हो... पण ज्योती तयार होईल का घरी यायला?

वेगळं काही

अलिकडेच अरवली पर्वतावर असणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्तीचा शोध लागला आहे. या पर्वतावर एक ज्वालामुखी असून हजारो वर्षांपासून त्यातून लाव्हा बाहेर आलेला नाही. या सुप्त ज्वालामुखीमुळे धोसी पहाडी नामक या डोंगरावर अनेक रहस्यमयी वनस्पती आढळून आल्या आहेत. या वनस्पतींमुळे चिरतारुण्य मिळवता येतं. कायाकल्प नावानं ओळखली जाणारी ही वनस्पती सौंदर्यवर्धनासाठी उपयुक्त आहेच त्याचबरोबर आरोग्यरक्षणासाठीही उपकारक आहे. महाभारतानुसार या डोंगराची उत्पत्ती त्रेतायुगात झाली. म्हणजेच तेव्हापासून आजपर्यंत इथे नैसर्गिक संपत्तीचा खजिना सर्वांसाठी खुला आहे.

रुचिरा

## टेस्टी मँगो चीजकेक

आंबा हे उन्हाळ्यातलं महत्त्वाचं आकर्षण असतं. मुबलक मिळणाऱ्या आंब्याचा वापर करुन विविध पाककृती बनवता येतात. आपण मँगो चीजकेक कसा बनवायचा ते पाहू या...



सामग्री - २० गोड बिस्किटं, पाव वाटी बटर, एक टेबलस्पून पिठीसाखर, एक वाटी मँगो पल्प, एक वाटी साखर, चवीपुरतं मीठ, चार अंड्यांचा बलक, तीन टेबलस्पून जिलेटीन, दोन वाट्या क्रीम, दोन वाट्या दही, आंब्याच्या फोडी इत्यादी.

कृती- बिस्किटांचा चुरा करून त्यात बटर आणि थोडी पिठीसाखर मिसळावी. मिश्रण एकजीव करुन केकच्या भांड्यात पसरुन घ्यावं. अर्धा कप पाण्यात जिलेटिन घालून सेट करायला ठेवावं. एका पातेल्यात मँगो पल्प, साखर, मीठ आणि अंड्याचा बलक एकत्र करुन मिश्रण मंद आचेवर एकजीव करून घ्यावं. गरम असतानाच मिश्रणात जिलेटिन मिसळून पातेलं गॅसवरून उतरवून घ्यावं. थंड झाल्यावर त्यात क्रीम घालावं. त्यानंतर दही मिसळावं. आता ते बिस्किटांच्या थरावर पसरून घ्यावं आणि सेट करण्यासाठी फ्रीजमध्ये ठेवावं. सर्व्ह करताना आंब्याच्या फोडींची सजावट करावी.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा-अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

**सुविचार**

कधीही जोखीम स्वीकारण्याचे भय वाटू देऊ नका, जर जिंकलात तर नेतृत्व कराल आणि जर हरला तर मार्गदर्शन कराल. **संकलित**

**सामान्यज्ञान**

डि एल आर ने वर्ष संपायच्या आधी त्यांच्या विमानाला आकर्षक उडणारा क्रेन पक्षी हे बोध चिन्ह दिले. जे आजही लुफ्तांसा एअरलाईन्सचे चिन्ह आहे. **संकलन - अरविंद ब्राम्हणे**

### महेंद्र गंधे; भाजपाच्या नमो संवाद सभांना शहरात प्रारंभ

# मोदींमुळे भारत विकसित देशांच्या यादीत

**समाचार/नगर-दि.२४**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केवळ १० वर्षाच्या काळातच देशाला विकसित देशांच्या रांगेत नेले आहे. काँग्रेच्या ७० वर्षांच्या काळात लाचार देश म्हणून संबोधला जाणाऱ्या आपल्या देशाला पूर्ण जगात स्वाभिमान मिळवून दिला आहे. पंतप्रधान मोदी हे आत्तापर्यंतचे सर्वात यशस्वी व कर्तृत्ववान पंतप्रधान ठरले आहेत. त्यांच्या विकास कामांचा हा केवळ एक छोटा ट्रेलर आहे, विकसीत भारताचा संपूर्ण पिक्चर अभी बाकी आहे. यासाठी नरेंद्र मोदींना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी व भाजपचा ४०० खासदारांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नगरमधून भाजपचे उमेवार खा.डॉ.सुजय विखे यांना विजयी करावे, असे आवाहन भाजपचे नगर शहर विधानसभा निवडणूक प्रमुख महेंद्र गंधे यांनी केले.



लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या वतीने जनतेशी संवाद साधण्यासाठी व देशात व राज्यात भाजपच्या सरकारांच्या माध्यमातून झालेला विकास सर्वसामान्य जनते पर्यंत पोहचवून भाजपच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ नमो संवाद कॉर्नर सभांचे आयोजन शहरात केले आहे. नगर शहराच्या नमो संवाद सभांचे प्रमुखवक्ते महेंद्र गंधे यांनी कापड बाजार येथे झालेल्या सभेत मनोगत व्यक्त केले. या सभांचा शुभारंभ माणिक चौकात झाला. यानिमित्ताने तयार करण्यात आलेल्या प्रचार रथाचे उद्घाटन माजी मध्यनगर अध्यक्ष अजय चितळे यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे, मध्य मंडल अध्यक्ष राहुल जामगावकर, प्रदेश सरचिटणीस तुषार पोटे, ज्ञानेश्वर काळे, सुरेखा विद्ये, बाबासाहेब सानप, नरेंद्र कुलकर्णी, प्रिया जानवे आदींसह मोठ्या संख्यने शहर भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी कालिंदी केसकर, अनिल गट्टाणी, गोकुळ काळे, वंदना पंडित, अनिल साबलोक आदींनी मनोगत व्यक्त केले. सभांचे प्रास्ताविक उदय अनभुले यांनी केले. यावेळी व्यंकटेश बोमादंडी, सुमित बटूळे, श्रीकांत फंड, सविता कोटा, वसंत राठोड, शरद बारस्कर, ज्योती दांडगे, बाळासाहेब भुजबळ, सुनील तावरे, कुसुम शेलार,सौ.निस्ताने, राखी आहेर, सुरेखा जंगम, बाळासाहेब तागड, सिद्धेश नाकाडे, मल्हार गंधे, नरेश चव्हाण, रियाज कुरेशी, रोहन शेलार आदी उपस्थित होते.

# मोदींची पुन्हा सत्ता येण्यापासून कोणी रोखू शकत नाही- खा. विखे



**समाचार/नगर-दि.२४**

नगर जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी आपण प्रयत्न करणार असून त्यादृष्टीने आराखडा तयार करण्यात आलेला आहे. येत्या पाच वर्षात नगर जिल्ह्याचा विकास हा सर्वासाठी एक उदाहरण राहणार आहे. देशात पुन्हा नरेंद्र मोदी यांचे सरकार येणार आहे. मोदींची पुन्हा सत्ता येण्यापासून कोणीही रोखू शकत नाही, असा विश्वास खा. सुजय विखे यांनी व्यक्त केला. यावेळी आमदार मोनिका राजळे, राहुल राजळे, माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, संजय बडे, तालुकाध्यक्ष मृत्यंजय गर्जे, बाळासाहेब गोल्हार, अजय रक्ताटे, प्रतीक खेडकर, माणिकराव बटोळे उपस्थित होते.

पाथर्डी तालुक्यातील जिरेवाडी येथे मेळाव्यात ते बोलत होते. खा. विखे म्हणाले की, राज्याच्या उत्पनात नगर जिल्ह्याचा वाटा महत्वाचा आहे. जिल्ह्यात सर्विस सेक्टरबरोबर शेतीला सुद्धा मोठा वाव आहे. कृषी संलग्न क्षेत्रांमध्ये रोजगाराची उच्च क्षमता जिल्ह्यात असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे कृषी प्रक्रिया, अन्न उत्पादन आणि कृषी पर्यटन अशा उद्योगांमध्ये रोजगार निर्मिती आणि स्वयंरोजगारासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगून खा. विखे पुढे म्हणाले की, जिल्ह्यात कृषी प्रयोगशाळांची निर्मिती केली जाणार आहे. पशुपालन व्यवसायाला चालना दिली जाणार आहे. शेळी-मेंढी पालनातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाच्या विविध योजना जिल्ह्यात राबविल्या जातील. त्याच बरोबर जिल्ह्यात बांधकाम व्यवसाय जोर धरत आहे. त्यातून सामान्यांना परवडणाऱ्या घरांच्या योजना केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून राबविल्या जातील. तसेच ट्रेडींग, रिपेरिंग, हॉटेल अशा व्यवसायांना अनुकूल वातारण निर्माण केले जाईल. जिल्ह्याचा भौगोलिक विचार करता पर्यटन क्षेत्रातून सुद्धा मोठ्या प्रमाणात जिल्ह्याचा विकास साधता येणार आहे. जिल्ह्यात एमआयडीसीच्या माध्यमातून देशी- परदेशी गुंतवणूक आणुन जिल्ह्याची उत्पादन क्षमता कशी वाढली जाईल, यावर भर देणार आहे. त्यासाठी रस्ते, वीज, पाणी आणि इतर पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम केले जाणार आहे. शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर शेतीला वाव दिला जाणार आहे, असे विखे यांनी सांगितले.

# आचारसंहितेचा धाक दाखवून दोघांनी व्यावसायिकाची सोन्याची चेन लांबवली

**समाचार/नगर-दि.२४**

पोलीस असल्याचे भासवून आचारसंहिता काळात गळ्यात सोन्याची चेन घालण्यास बंदी असल्याची बतावणी करून व्यावसायिकाकडील सुमारे सहा लाखाची सोन्याची चेन दोघांनी लंपास केली. केडगाव उपनगरात ही घटना घडली.



फसवणूक झालेले व्यावसायिक बाबुराव नारायण काकडे (वय ६८, रा. राजेंद्रनगर, केडगाव) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात दोघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काकडे हे दुचाकीवरून केडगावातील त्यांच्या दुकानात जात असताना केडगाव वेशी जवळ दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तीने त्यांना थांबण्यास सांगितले. काकडे रस्त्याच्या कडेला थांबले असता ते दोघे म्हणाले, आम्ही पोलीस असून आचारसंहिता चालू असताना तुम्ही सोन्याची चेन कशी घातली. आम्हाला तुमच्यावर संशय आहे. तुम्ही तुमच्या गाडीच्या डिक्कीतून गांजा घेवून जात आहेत, तुम्ही गाडीची डिक्की उघडून दाखवा व तुम्ही घातलेली सोन्याची चेन गाडीच्या डिक्कीत ठेवा. काकडे यांनी त्यांच्यावर विश्वास ठेऊन गळ्यातील १३ तोळ्याची सोन्याची चेन डिक्कीत ठेवली. त्या दोन व्यक्तीने त्यांच्या हाताने डिक्की बंद करून ते दुचाकीवरून नगरच्या दिशेने गेले. काकडे देखील त्यांच्या दुकानाकडे जाण्यासाठी निघाले असता त्यांना संशय आल्याने त्यांनी थांबून डिक्की तपासली असता त्यात त्यांना सोन्याची चेन दिसून आली नाही. आपली फसवणूक झाल्याचे काकडे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी कोतवाली पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली.

# नवीपेठ श्रीराम मंदिरात हनुमान तांडवस्तोत्र पठण कार्यक्रम

**समाचार/नगर-दि.२४**

श्रीराम मंदिर नवीपेठ येथे हनुमान तांडव स्तोत्र पठण कार्यक्रम नुकताच सपन्न झाला.फाउंडेशन फॉर हॉलिस्टिक डेव्हलपमेंट या संस्थेचे प्रमुख सौं माधुरी सहस्त्रबुध्दे यांच्या संकल्पनेतील 'मातृशक्ती का तांडव' यातील दुसरे पुष्प रामतांडव व चौथे पुष्प हनुमान तांडव की ज्याच्याकडे शक्ती, भक्ती आणि ऊर्जा चा संगम आहे असे रामदूत हनुमानजी यांचे हनुमान तांडव स्तोत्र पठण सकारात्मकतेने भरलेल्या वातावरणात सपन्न झाले.

अध्यक्ष प्रितम मुथा व उपाध्यक्ष निखिल शेटीया यांचे कार्यक्रमासाठी सहकार्य मिळाले.श्री राम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट, नवीपेठ या नवीन वर्षातील गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर नवीन श्रीकृष्ण तांडव कार्यक्रम होणार आहे त्याची नोंदणी चालु झाली आहे तरी आपापल्या सखींना त्याची कल्पना द्यावी तसेच यासंदर्भात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# आकाशात घडले 'गुलाबी चंद्र' दर्शन

**समाचार/नगर-दि.२४**

बुधवारी पहाटे सुमारास आकाशात गुलाबी चंद्राचे दर्शन घडले . या खगोलीय आविष्कारात आकाश निरीक्षण करणारे आज पहाटेच्या वेळी या पिंक मून किंवा सुपरमूनचे साक्षीदार बनले . तथापि,या नावाचा अर्थ असा नाही की चंद्र गुलाबी दिसला. एप्रिलच्या पौर्णिमेचे नाव मॉस पिंक या औषधी वनस्पतीच्या नावावरून ठेवण्यात आले, ज्याला झुबकेदार शोभिवंत फुलांचे एक रानटी फुलझाड, मॉस फ्लॉक्स असेही म्हणतात - ही एक वनस्पती मूळची पूर्व अमेरिकेतील आहे आणि वसंत ऋतूच्या सुरुवातीला बहरणाऱ्या फुलांपैकी एक आहे. एप्रिलच्या चंद्राला किनारपट्टीच्या संस्कृतींद्वारे फिश मून, अंडी चंद्र आणि अंकुरणारा गवत चंद्र म्हणून देखील संबोधले जाते. यालाच पासओव्हर मून किंवा पेसाच असेही म्हणतात.

बुधवार, २४ एप्रिल रोजी सकाळी ५:१८ रोजी चंद्र भारताच्या खगोलात होता.तर दुसरीकडे, तो पूर्व अमेरिकेत संध्या होता . पौर्णिमेचा चंद्र सरासरीपेक्षा मोठा दिसतो, कारण तो पृथ्वीच्या सर्वात जवळ असतो .

जेव्हा चंद्र सूर्यापासून पृथ्वीच्या अगदी विरुद्ध बाजूला असतो तेव्हा पूर्ण चंद्र होतो. ही वेळ त्या त्या देशाच्या टाईम झोनवर अवलंबून असते. कारण डरलिश.लो नुसार चंद्राचा टप्पा ग्रहाच्या पृष्ठभागावरील व्यक्तीच्या स्थानापेक्षा पृथ्वीच्या संबंधात त्याच्या स्थानावर अवलंबून असतो.

गुलाबी चंद्र पाहण्यासाठी, लोकांना फक्त स्वच्छ आकाश आवश्यक असते . ज्यामध्ये प्रकाश प्रदूषण नाही आणि अतिरिक्त उपकरणे नाहीत. जर तुम्हाला दुर्बिणी किंवा लहान दुर्बिणी वापरायची असेल तर चमक टाळण्यासाठी विशेष फिल्टर असणे महत्वाचे आहे, कारण यामुळे दृश्य मर्यादित होऊ शकते.

हिंदूंसाठी, ही पौर्णिमा हनुमान जयंतीशी संबंधित आहे, भगवान हनुमानाच्या जन्माचा उत्सव, हिंदू चंद्र महिन्याच्या चैत्र महिन्याच्या पौर्णिमेच्या दिवशी बहुतेक भागात साजरा केला जातो.ख्रिश्चन चर्चच्या कॅलेंडरमध्ये, हा पाश्चल चंद्र आहे, ज्यावरून ईस्टरची तारीख मोजली जाते. पाश्चल ही पसाचची लॅटिनीकृत आवृत्ती आहे. साधारणपणे, ईस्टरची ख्रिश्चन सुट्टी, ज्याला पाश्चल देखील म्हणतात, वसंत ऋतूच्या पहिल्या पौर्णिमेनंतरच्या पहिल्या रविवारी साजरी केली जाते.


**पान १ वरुन**


## स्वच्छता निरीक्षकांना बजावल्या नोटीसा

आदेशानुसार कारवाई करून त्याचा दैनंदिन अहवाल सादर करावा, असे उपायुक्तांनी नोटिसीत म्हटले आहे. दरम्यान, खाऊ गल्ली, चौपाटी, बाजारपेठ परिसरात व चिकन मटन विक्रेते असलेल्या परिसरात कचरा व ॲनिमल वेस्ट उचलण्यासाठी वाहने उपलब्ध करून देण्याच्या सूचना संबंधित एजन्सीला देण्यात आल्या आहेत.

## ज्येष्ठ पत्रकार स.म. कुलकर्णी यांचे निधन

पत्रकारितेतून निवृत्त घेत साप्ताहिकाच्या माध्यमातून कार्यरत राहिले. कोपरगाव पत्रकार संघाचे ते माजी अध्यक्ष होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कोपरगावातील ज्येष्ठ पत्रकार सतीश कुलकर्णी यांचे ते वडील होत. स.म.कुलकर्णी यांच्या निधनाने जिल्ह्यातील अभ्यासू, चिंतनशील आणि धडाडीचा पत्रकार हरपला, अशी प्रतिक्रिया संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांनी दिली. कुलकर्णी यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी कोपरगांव येथील अमरधामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. स.म.कुलकर्णी हे मनमिळावू स्वभावाचे होते. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे.

## शहरातून मोटारसायकल चोरणारा जेरबंद

हा दुचाकी चोरी करण्याच्या उद्देशाने आयुर्वेद कॉर्नर येथे आलेला आहे. त्यांनी गुन्हे शोध पथकाला सापळा रचून कारवाई करण्याची सूचना केली. त्यानुसार गुन्हे शोध पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून एका इसमास ताब्यात घेतले. त्याने त्याचे नाव नितीन नवघरे असे सांगितले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने नगर शहरातून विविध ठिकाणावरून सहा दुचाकी चोरल्याचे सांगितले. पोलिसांनी २ लाख १० हजार रुपये किमतीच्या सहा दुचाकी हस्तगत केल्या. पुढील तपास कोतवाली पोलिस करत आहेत.

## नगरमध्ये आयपीएल सट्टाबाजार जोमात

वेळप्रसंगी मारहाण करून त्यांच्या जवळील किंमती वस्तू देखील उचलून नेल्या जातात. बऱ्याच वेळा याची भरपाई पालकांनाच करावी लागते. या सट्ट्याचे लोण शहरातून आता ग्रामीण भागाकडे पसरत आहे. आधीच लहरी पर्जन्यमान, शेतीमालाचे दर आणि आत्महत्येच्या संकटांमुळे ग्रासलेला शेतकऱ्यांच्या मुलांपर्यंत हे पसरले तर आयुष्यातून उठण्याची वेळ त्या कुटुंबावर येऊ शकते.मुलांच्या उज्वल भवितव्यासाठी काबाडकष्ट करणाऱ्या पालकांना हा मोठा आर्थिक आणि मानसिक धक्का असतो. झालेले नुकसान भरून काढण्यासाठी काही वेळेस हे तरुण अवैध धंद्याच्या जाळ्यात सापडल्याच्या देखील घटना घडत आहे. आयपीएल सट्टा हा पूर्णपणे बेकायदेशीर असून त्यावर पोलिस प्रशासनाकडून या संदर्भात कडक कारवाईची अपेक्षा आहे. काही मोजक्या बुकिंच्या नादाला लागून मोठा तरुण वर्ग या जाळ्यात सापडत आहे. अशा बुकिंना युद्ध पातळीवर शोधून त्यांच्यावर तातडीने सक्त कारवाई करणे गरजेचे आहे. पोलिस प्रशासन यावर वेळोवेळी कारवाई करत असते, परंतु त्याची तीव्रता वाढविण्याची गरज आहे. ऑनलाईन पद्धतीचे असे ॲप्लिलिकेशन मोबाईलवर उपलब्ध असतात. त्यासाठी देखील एक प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे. तरुण वर्ग हा देशाचे भविष्य आहे, त्यासाठी मुलांचे भवितव्य उज्वल करणे गरजेचे आहे. त्यामुळे वेळीच अशा व्यवसायांना प्रतिबंध करून तरुण पिढीला भरकटण्यापासून आळा घालण्यासाठी जिल्हा आणि पोलीस प्रशासनाने स्वतंत्र विचार करण्याची मागणी पालक आणि दक्ष नागरिकांकडून होत आहे.

# अशोक बोज्जा यांचे निधन

**समाचार/नगर-दि.२४**



अशोक मल्लाय्या बोज्ञा, कारभारी (वय ७५) यांचे राहत्या घरी पंचपीर चावडी येथे निधन झाले. त्यांना तीन मुले या पैकी एक मुलगा मयत, सुना, नातवंड असा परिवार असून अशोक बोज्ञा हे पदमशाली समाजातील कारभारी म्हणून अनेक वर्षे काम केले ते नगर ते आळंदी मार्कंडेय महामुनी पायी दिंडी सोहळा चे संस्थापक होते आज ही हा दिंडी सोहळा चालू आहे.


**समाचार**

**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.





**हनुमान चालिसा**

**श्री दक्षिण मुखी हनुमान सत्संग मंडळ**

**बुधवार, दि. २४ एप्रिल २०२४**

**रात्रौ ८.३०**

**- स्थळ -**

**ॲड. हरिष शरद भामरे परिवार**

आनंद कॉम्प्लेक्स, नक्षत्र कॉर्नर, सारसनगर


## मुंबई शेअर भाव

**व्होडाफोन आयडियाने सर्वांना केलं खूश मागेल तेवढी क्वांटिटी केवळ ११ रुपयांत**

(शेअर सबब्रोकर)

अशोक पटवा

फोन-२४५२५२७, २४५२२६४

मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक २४-४-२०२४**

**दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७४००४ |
| एसीसी | २५६०-६१ |
| एशियन पेंट | २८६७-६८ |
| बजाज ऑटो लि. | ८७८७-८८ |
| बलराम फूड चिनी | ३८७-८८ |
| भारत फोर्ज | १२३०-३१ |
| क्रॉम्प्टन | ३१४-१५ |
| डीएलएफ | ८८९-८९ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | ५९६२-६३ |
| ग्रॅफाईट इंडिया | ६८२-८३ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २२५८-५९ |
| आयटीसी लि. | ४३०-३१ |
| एल ॲण्ड टी लि. | ३६५०-५१ |
| रिलायन्स इंड. | २९१४-१५ |
| एसबीआय | ७७१-७२ |
| टाटा मोटर्स | ९९१-९२ |
| टाटा स्टील | १६५-६६ |
| टीसीएस | ३८४३-४४ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | २५२-५३ |
| सुवेन फार्मा | ६४५-४६ |

PDF Compressor Free Version



# प्रभू हनुमान शक्ती आणि श्रद्धेचे प्रतीक- आ. जगताप




**समाचार/नगर-दि.२६**

हनुमान जयंतीनिमित्त नालेगाव येथे पारंपारिक भव्य शोभायात्रा संपन्न झाली. यावेळी टाळ मृदुंगाच्या गजरात व श्री हनुमानाच्या नामघोषाने परिसर अक्षरशः दुमदुमला होता. नालेगाव ग्रामस्थांच्या वतीने शोभायात्रेनिमित्त रस्त्यावर ठिकठिकाणी आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती तसेच पालखीचे स्वागत करून फुलांचा वर्षाव करण्यात आला.

नालेगाव गाडगीळ पटांगण येथे हनुमान जयंतीनिमित्त शोभायात्रा व अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता ह.भ.प.मारुती महाराज झिरपे यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. यावेळी आ. संग्राम जगताप, प्रा. माणिक विधाते, माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल आदीसह भाविक उपस्थित होते

श्री हनुमान हे शक्ती आणि श्रद्धेचे प्रतीक

आजच्या युगामध्ये धार्मिकतेची परंपरा अखंडितपणे सुरू राहण्यासाठी अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन होणे गरजेचे आहे. या माध्यमातून संस्काराचा व विचाराचा वारसा पुढे घेऊन जाता येत असतो. नालेगावमधील मुदगल कुटुंबीयांनी गावपण जोपासण्याचे काम केले आहे, असे मत आमदार जगताप यांनी व्यक्त केले.

अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून समाज एकवटला जात असतो. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने सुरू असलेला अखंड हरिनाम सप्ताह धार्मिक कार्यक्रमाचे केंद्र बनले आहे, असे मत ह.भ.प.मारुती महाराज झिरपे यांनी व्यक्त केले.

## यशोदा लंके फाऊंडेशनचा उपक्रम

# दुर्धर आजारांनी पीडित रूग्णांची मोफत तपासणी

**समाचार/नगर-दि.२६**




खडकी (ता. नगर) येथे दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या रुग्णांची मोफत तपासणी करुन औषधोपचार करण्यात आले. यशोदा लंके फाउंडेशन व होलीस्टिक क्लासिकल होमिओपॅथिक क्लिनिक व रिसर्च सेंटरच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. या शिबिरास पंचक्रोशीतील ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. या शिबिराचे उद्घाटन खडकी गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. सरपंच प्रवीण कोठुळे, उपसरपंच दगडू गायकवाड, पाणीपुरवठा सदस्य सचिन भिकाजी कोठुळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष पुढाकार घेऊन या शिबिराचे आयोजन केले होते .

यशोदा लंके फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रमोद लंके यांनी दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या रुग्णांची तपासणी करुन होमिओपॅथिक उपचार पध्दतीने दुर्धर आजार कायमचे संपणार असल्याचे स्पष्ट केले. तर या शिबिरात शंभरपेक्षा अधिक रुग्णांवर मोफत औषधोपचार करून त्यांना पुढील औषधोपचारासाठी ही योग्य मार्गदर्शन केले जाणार असल्याची त्यांनी माहिती दिली.

# यश शहा यांचा सत्कार




**समाचार/नगर-दि.२६**

इंजि.यश शहा यांच्या जैन अल्पसंख्यांक बांधवांसाठी, गोशाळांसाठी सेवा, साधुसंत गुरु महाराज विहार साठी पोलीस संरक्षण व इतर सामाजिक मदतकार्यासाठी दिलेल्या सामाजिक योगदानाची दखल घेऊन त्यांची राष्ट्रीय कार्याध्यक्ष - अखिल भारतीय जैन दिवाकर मंच, नवी दिल्ली तसेच उपाध्यक्ष जैन श्वेतांबर श्रावक गुजराती समाज, अहमदनगर या दोन्ही पदी निवड झाली आहे.

या निवडीबद्दल एसाच्या वतीने शहा यांचा सपत्नीक जिल्हा टाऊन प्लॅनिंग डिपार्टमेंटचे प्रमुख पंडित, जिल्ह्याचे प्रमुख व्यवस्थापक पुरोहित, येसेकर व टीम, आर्च क्रांतीचे प्रसिद्ध आर्किटेक्ट माळी, एसाचे अध्यक्ष कार्ले, सेक्रेटरी तांदळे, उपाध्यक्ष दहिफळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

राष्ट्रीय स्तरावर निवड ही संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे असे तांदळे यांनी सांगितले.

यश हे एसाचे संचालक म्हणून कार्यरत आहेत.

सत्कार प्रसंगी जिल्ह्यातील एसाचे दीडशेपेक्षा जास्त आर्किटेक्ट, इंजिनियर्स, सर्व्हेअर्स सभासद उपस्थित होते. सत्कारामुळे सामाजिक जबाबदारी आणखी वाढल्याची भावना शहा त्यांनी व्यक्त केली.

# शिक्षकांनी रक्तदानातून दिला सामाजिक संदेश- जाधव



**समाचार/नगर-दि.२६**

रक्तदान ही काळाची गरज झाली असून, प्रत्येकाने रक्तदान करणे आवश्यक आहे. आपल्या एका रक्तदानामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात. प्राचार्य सुनिल पंडित यांनी विविध संघटनेचे काम करत असतांना आपल्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबीरसारखा स्त्युत्य उपक्रम राबविला आहे. शिबीरात शिक्षकांनी केलेल्या रक्तदानामुळे कृतीतून दिलेला संदेश समाजिक भावनेचा आदर ठरेल, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांनी केले.

प्राचार्य सुनील पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाबद्दल तसेच वाढदिवसाच्या अवचित साधून सुनील पंडित मित्र मंडळाच्यावतीने दादा चौधरी विद्यालय कोर्ट गल्ली येथे भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबीराचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी भाजपाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य प्रा.भानुदास बेरड, अ.भा. शैक्षणिक संघाचे प्रांताचे संघटन मंत्री दिलीप अहिरे, दादा चौधरी विद्यालयाचे अध्यक्ष अनंत देसाई, राज्य शिक्षक परिषदेचे नाशिक विभागाचे अध्यक्ष शरद दळवी, विभाग कार्यवाह सचिन पाटील, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे सदस्य बाबासाहेब बोडके, कार्यवाह शिवाजी घाडगे, खजिनदार प्रसाद सामलेटी आदी उपस्थित होते.

दिलीप अहिरे, प्रा. भानुदास बेरड, अनंत देसाई यांची भाषणे झाली.

यावेळी शिक्षण अधिकारी (योजना) बाळासाहेब घुगे, उपशिक्षण अधिकारी आकाश दरेकर, विस्तार अधिकारी शिंदे, विस्ताराधिकारी ढवळे, बाबासाहेब बोडके आदींनी मार्गदर्शन केले.

# छंद नाण्यांचा........

**सामान्यातील असामान्य**




आजच्या धाकधकाईच्या जीवनात छंद हेच आपल्या मनाला सुख, समाधान आणि आनंद मिळवून देतात. आपल्याला जगण्याचा खरा अर्थ अनेक प्रकारच्या छंदामधून मिळत असतो. एक हौस किंवा विरंगुळा म्हणून आपण जे काही करतो ते छंद म्हणूनच गणले जाते. छंदामुळेच आपल्या व्यक्तिमत्वाला नवीन पैलू आणि परिणाम प्राप्त होतात. ठराविक प्रकारच्या कामामुळे येणारी रुक्षता आणि मनाला येणारे मळभ हे दूर करण्यासाठी एखादा छंद जोपासणे महत्वाचे असते. त्यामुळे जीवनाला एक नवा अर्थ प्राप्त होतो. छंद माणसाला घडवतात आणि त्याच्या आयुष्याला नवी दिशा देखील देतात. बँकिंग क्षेत्रात कॅश क्लार्क म्हणून काम करणारे अनिल कालेकर हे असेच एक छंदिष्ट व्यक्तिमत्व. १९७८ साली त्यांनी जेव्हा बँकेची नोकरी मिळाली अगदी तेंव्हापासूनच त्यांचा रुपये पैशांचा प्रत्यक्ष संबंध आला. रोजच कागदाच्या रुपयांच्या नोटा आणि धातूची नाणी हाताळताना नोटापेक्षा धातूंच्या विविध नाण्यांबद्दल अनिल याना प्रचंड आकर्षण निर्माण झाले आणि या आकर्षणातूनच वेगवेगळ्या प्रकारची मूल्य असलेली नाणी जमविणे ही त्यांच्या छंदाची सुरूवात झाली.

सुरूवातीला त्यांनी नाण्यांचा इतिहास अभ्यासला आणि त्यांना नाण्याविषयी मौलिक माहिती मिळाली. प्राचीन भारतीय साहित्यात बृहद्अरण्यक, उपनिषद, अग्निपुराण, मत्स्यपुराण, मनुस्मृती इत्यादी प्राचीन ग्रंथात सुवर्ण, द्रम, कार्षापर्ण, निष्क, कृष्णल, रुपया याची माहिती अनिल यांनी समजून घेतली. नाण्यांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे नाणेशास्त्र असे म्हटले जाते. याच शास्त्राच्या आधारे एखाद्या प्रदेशाचा आर्थिक विकास आणि ऐतिहासिक समाजाचे आकलन या प्रमुख गोष्टी प्रकाशात येतात. नाणी जमविण्याच्या छंदातून अनिल यांनी भारतीय नाण्यांचा संपूर्ण इतिहासच आत्मसात केला आणि तो याच नाण्यांच्या प्रदर्शनच्या माध्यमातून लोकांसमोर आणला. भारतीय नाण्यांचा जन्म इ.स. पूर्व सहाव्या शतकात झाला असे मानतात. भारतीय नाण्यांना २६०० वर्षापेक्षा अधिक जूनी परंपरा आहे. काशी, मगध, पांचाल, गांधार, कलिंग या राजवटींनी प्रथम नाणी पाडली आणि ती चौकोनी, गोल, षट्कोनी अशा विविध आकारात बनविली जात असत. मौर्य साम्राज्य, सम्राट अशोकाचा काळ, गुप्त साम्राज्य, सातवाहन राजे यांनी सोने, चांदी आणि तांबे अशा धातूंचा नाण्यासाठी वापर केला. अनिल यांच्या नाणेसंग्रहात ५,१०, २० आणि २५ पैशांची नाणी आहेत शिवाय १, २, ५ आणि १० रुपयांची नाणी देखील आहेत. सुमारे १२१ नाणी त्यांनी जमवलेली आहेत. या नाण्याच्या पाठच्या बाजूस मत्स्य उद्योग, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, इंदिरा गांधी, पंडित नेहरू, सेल्युलर जेल, लुई ब्रेल, लोकनायक जयप्रकाश नारायण, महात्मा गांधी, राजीव गांधी, सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया, विश्व खाद्य दिवस, दांडीयात्रा, प्रथम स्वातंत्र्य संग्राम, आशियायी खेळ स्पर्धा अशा महान व्यक्ती आणि प्रसंग या सर्वांच्या स्मृती जतन करणाऱ्या प्रतिमा आहेत. अनिल यांच्याकडील सर्व नाणी ही दुर्मिळ आहेत आणि त्यांच्या निवृत्तीनंतर देखील त्यांनी आपला नाणे संग्रह कायम ठेवला आहे. त्यांच्याकडील अशा विविध दुर्मिळ नाण्यांचा त्यांनी एक अल्बमचं तयार केला आहे. अनिल कालेकर यांच्यासारखी छंदिष्ट माणसं अशा दुर्मिळ छंदाद्वारे स्वतःचा आनंद शोधताना जगाला देखील फार अनमोल असं काहीतरी ज्ञानात भर घालणार असं देतात हे नक्की.




संकलन-संयोजन
**सुबोध रणशेवरे**
subodh.ranshevre rediffmail.com

# लोकसभेसाठी मतदान करताना आपले निकष काय असणार?



**माझं मत**

## अमेय वाघ (शिक्षक)

देशाचा सर्वात मोठा लोकोत्सव म्हणजे लोकसभेच्या सध्या सुरु असलेल्या निवडणुका. दर पाच वर्षांनी आपल्या देशात लोकशाही पद्धतीने या निवडणुका होतात. अर्थात म्हणूनच मतदान करताना तो उमेदवार कोणत्या धर्माचा, जातीचा किंवा ठराविक पक्षाचा आहे यापेक्षा या उमेदवाराचे आपल्या मतदारसंघासाठी मागील पाच वर्षातील योगदान काय या निकषावरच मतदान करणार.

## श्रेया जाधव (गृहिणी)

आपल्या देशाच्या संविधानाने एक नागरिक म्हणून आम्हाला अत्यंत अमूल्य असा मतदानाचा हक्क दिला आहे. हाच हक्क बजावताना धार्मिक अवडंबरापेक्षा ठराविक उमेदवार हा शिक्षण, रोजगार, महागाई, शेतकऱ्यांचे, कामगारांचे प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न याबाबत किती गंभीर आहे? आणि अशा सर्व घटकांसाठी त्याचा अजेंडा नेमका किती विश्वासार्ह असणार आहे हे तपासूनच मी मत देणार.

## विक्रांत रणशेवरे (विद्यार्थी)

आपल्या लोकशाही प्रधान देशात हल्ली निवडणुकांचं अक्षरशः बाजारीकरण झालेले आहे. पक्ष, निष्ठा, समाजसेवा या गोष्टी कालबाह्य झाल्या असून केवळ काळ्या पैशाच्या जोरावर आमदार, खासदार यांची खरेदी विक्री करून आपले उखळ पांढरे करणारे राजकीय नेते सर्वच पक्षात दिसतात. त्यामुळे जो पक्ष लोकांच्या भल्याचा विचार करून पुढील पाच वर्षात नक्की कोणती लोकोपयोगी काम करणार हे समजून घेतल्यानंतरच अशा स्वच्छ उमेदवाराला मत देणार.

## राजीव संत (शेतकरी)

पक्ष कोणताही असला किंवा सत्ता कोणत्याही पक्षाची असली तरी कोणत्याही पक्षाच्या खासदारांनी आजवर जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांच्या तोंडाला कायम पान पुसलेली आहेत. म्हणूनच या निवडणुकीत मतदान करताना शेतकऱ्यांना जगवणाऱ्या आणि त्याच्या गंभीर प्रश्नांची उकल करणाऱ्या उमेदवारालाच माझे मत असेल.

## शब्दखेळ - १५६

खाली दिलेल्या चौकोनात महाराष्ट्रातील १० नामवंत संतांची नाव लपलेली आहेत. शोधा पाहू.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ज्ञा | क | तु | का | रा | म | वा | ए |
| स | ने | स्वा | त | त्र्य | वी | गो | क |
| र | व | श्व | क | का | म | रा | ना |
| मु | दे | ना | र | दे | व | कु | थ |
| क्ता | म | ड | सो | पा | न | भा | ळा |
| बा | ना | जा | ब | सि | ह | र | मे |
| ई | सा | व | ता | मा | ळी | द | खा |
| ज | ना | बा | ई | हा | मा | न | यो |

## शब्दखेळ - १५५ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | शें | पा | व | रा | ज | गि | रा |
| बु | ग | ग | व | न | न | रं | ब |
| दा | दा | णे | री | व | मे | ग | टा |
| णा | णा | शो | शी | रा | को | प | टा |
| मी | द | ही | य | त्री | थिं | च | न |
| ज | र | व | जा | ग | बी | मी | ख |
| य | ता | ट | पू | र्णी | दू | दे | जू |
| अं | ळे | भ | ग | र | ध | श | र |

# यामाहाची स्मार्ट EROX १५५ आवृत्ती लाँच




**तंत्र मंत्र**

इंडिया यामाहा मोटर प्रा.लि. ने, 'द कॉल ऑफ द ब्लू' ब्रँड मोहिमेशी संरेखित होऊन, AEROX 155 आवृत्ती S लाँच केली आहे जी कार्यप्रदर्शन, शैली आणि नाविन्यपूर्णतेला मूर्त रूप देते. मॅक्सी-स्पोर्ट्स स्कूटरची नवीनतम आवृत्ती प्रगत स्मार्ट की तंत्रज्ञानासह आली आहे ज्याचा उद्देश शहरी सेटिंग्जमधून चालणाऱ्या रायडर्ससाठी सुविधा आणि सुरक्षितता वाढवणे आहे. EROX 155 आवृत्ती S, फक्त ब्लू स्क्वेअर शोरूम्सवर, दोन आकर्षक रंगांच्या छटांमध्ये उपलब्ध असेल - सिल्व्हर आणि रेसिंग ब्लू ची किंमत रु.१,५०,६०० (एक्स-शोरूम, दिल्ली).

EROX 155 आवृत्ती S चे स्मार्ट की वैशिष्ट्य शहरी गतिशीलता पुन्हा परिभाषित करण्यासाठी आणि रायडर्सना अखंड अनुभव देण्यासाठी तयार करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, तिची बॅक क्षमता गर्दीच्या भागात सहज ओळखण्यासाठी शहराच्या गजबजलेल्या वातावरणात स्कूटर शोधण्यात, फ्लॅशिंग ब्लिंकर्स आणि बजर आवाज सक्रिय करण्यात मदत करते. याव्यतिरिक्त, कीलेस इग्निशन स्टार्टअप प्रक्रियेला सुव्यवस्थित बनवते, ज्याने रायडर्सना प्रॉक्सिमिटी डिटेक्शनद्वारे त्यांची स्कूटर सहजतेने सुरू करण्यास सक्षम करते, मॅन्युअल की घालण्याचा त्रास दूर करते. रायडर नॉबला इग्निशन पोझिशनवर फिरवून आणि फक्त स्टार्ट बटण दाबून सहजतेने वाहन सुरू करू शकतो.

ही नवकल्पना केवळ सुविधाच वाढवत नाही तर अनधिकृत प्रवेश किंवा चोरीचा धोका कमी करून सुरक्षा देखील वाढवते. स्मार्ट की मध्ये एक इमोबिलायझर फंक्शन समाविष्ट आहे, जेव्हा की रेंजच्या बाहेर असते तेव्हा स्कूटरचे संरक्षण सुनिश्चित करते, संभाव्य धोक्यांपासून रायडर्सना मनःशांती प्रदान करते. शेवटी, EROX 155 आवृत्ती S ची स्मार्ट की कार्यक्षमता सुविधा, सुरक्षितता आणि प्रगत तंत्रज्ञान अखंडपणे एकत्रित करून वापरकर्त्यांच्या अनुभवाला पुन्हा परिभाषित करते, आजच्या गजबजलेल्या शहरी लँडस्केपमध्ये रायडर्ससाठी एक नितळ आणि अधिक आनंददायक प्रवास प्रदान करते.

PDF Compressor Free Version



## दत्तात्रय डोळसे यांची उपाध्यक्षपदी निवड

# पवन नागरी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अर्चना काळे

**समाचार/नगर-दि.२४**



पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अर्चना काळे व उपाध्यक्षपदी दत्तात्रय डोळसे यांची निवड झाल्यानंतर पतसंस्थेच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संचालक किरण धारक, मनोज क्षीरसागर, निशिकांत शिंदे, प्रसाद शिंदे, बाळासाहेब हुचे, संजय धोकरिया, आशा चौरे, अभय काळे, सागर काळे दिपक भागवत, कविता डोळसे, अमृता शिंदे आदि उपस्थित होते.

निवडीनंतर नूतन अध्यक्ष अर्चना काळे म्हणाल्या, पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालकांच्या एकत्रित प्रयत्नाने आज पतसंस्था प्रगती पथावर आहे. सभासदांच्या हिताचे निर्णय घेऊन ठेवीदारांना आकर्षक व्याजदर मिळत आहे. पतसंस्थेच्या चांगल्या कारभारामुळे सर्वांचा दिवसेंदिवस विश्वास वाढत आहे. सर्वांच्या सहकार्याने आपल्यावर अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली, ती सर्वांना बरोबर घेऊन पार पाडू, असा विश्वास व्यक्त केला. उपाध्यक्ष दत्तात्रय डोळसे म्हणाले, ग्राहक, सभासद, ठेवीदार यांच्या समन्वयातून पतसंस्थेचा लौकिकात वाढ करण्याचा आपला प्रयत्न राहील, असे सांगितले. प्रसाद शिंदे यांनी पतसंस्थेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.



## निमगाव वाघात हनुमान जन्मोत्सवाचा जल्लोष

**समाचार/नगर-दि.२४**

निमगाव वाघा (ता. नगर) गावात हनुमान जन्मोत्सव सोहळा मंगळवारी (दि.२३ एप्रिल) विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तीमय वातावरणात पार पडला. हनुमान मंदिरामध्ये पहाटे विधिवत पूजा व आरती करण्यात आली. तर रात्री भजनाच्या भक्तीरसात भाविक तल्लीन झाले होते.

गावातील भजनी मंडळाने रामभक्त हनुमान यांच्यावर विविध भजन सादर केले. पहाटे मंदिरात अभिषेक करुन आरती करण्यात आली. दिवसभर भाविकांनी मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली होती. भाविकांना यावेळी प्रसादाचे वाटप करण्यात आले. तसेच मंदिरास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.या धार्मिक कार्यक्रमास डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य नाना डोंगरे, पिंटू जाधव, भरत बोडखे, तुकाराम फलके, सचिन कापसे, सुरेश जाधव, भाऊसाहेब कापसे, बाबा खळदकर, संदीप डोंगरे, अनिल डोंगरे, पोपट भगत, अजय ठाणगे, गोरख गायकवाड, छगन भगत, दत्तू फलके, विठ्ठल फलके, तुकाराम खळदकर, चंद्रकांत जाधव आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.



## हनुमान मित्र मंडळातर्फे महाप्रसाद वाटपाचा उपक्रम

**समाचार/नगर-दि.२४**

शहरातील सर्जेपुरा येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिरात हनुमान जयंती निमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी हनुमान भक्त मित्र मंडळा तर्फे महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सदर मंडळाचे हे पाच वर्ष असून मंदिराचे मुख्य पुजारी कन्हैय्यालाल परदेशी, प्रवीण परदेशी यांनी मंदिर परिसरात जागा उपलब्ध करून दिली आहे. महाप्रसादाचे वाटप पहाटेपासून दिवसभर चालले होते. अनेक हनुमान भक्तांनी प्रसादाचा लाभ घेतला.

हनुमान भक्त मित्र मंडळातर्फे मोहटा देवस्थानचे विश्वस्त अ‍ॅड विक्रम वाडेकर, सावन छाब्रा, प्रदीप वाखुरे, माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर,कमल कोहली,अ‍ॅड संदीप पाखरे,विशाल बोराडे, विक्रम नारंग, हिरा मोतीयानी, महेश गोपालकृष्णन, हार्दिक जगड, संग्राम खिलारी, पवन पारेक, राहुल हसेजा, पवन खितानी आदी मित्रपरिवारांनी विशेष परिश्रम घेतले.

## राहुरीत तनपुरे कारखान्याच्या कामगारांचा मेळावा

# कामगारांच्या प्रश्नांची सोडवणूक करणार- कर्डिले

**समाचार/नगर-दि.२४**

डॉ. तनपुरे सहकारी साखर कारखान्यात आपण कधीच राजकारण केले नाही. कामगारांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आम्ही कटिबध्द आहोत, असे प्रतिपादन जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजी कर्डिले यांनी केले.

राहुरी येथे डॉ. तनपुरे सहकारी साखर कारखाना कामगारांचा मेळावा कर्डिले यांच्या उपस्थितीत पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी नगरसेवक विक्रम भुजाडी, साखर कामगार युनियनचे अध्यक्ष गजानन निमसे, उपाध्यक्ष अर्जुन दुशिंग, सचिव सचिन काळे, जिल्हा उपाध्यक्ष अमोल भनगडे, संचालक रवींद्र म्हसे, कामगार नेते कारभारी खुळे, सुरेश थोरात उपस्थित होते.



कर्डिले म्हणाले की, आम्ही कधीही डॉ. तनपुरे कारखान्यात राजकारण केले नाही. सभासदांनी निवडणुकीत निवडणूक दिलेल्या पॅनलला मदत करण्याचे आम्ही जाहीर केले होते. त्यानुसार संचालक मंडळास मदत केली आहे.

जिल्हा बँकेच्या माध्यमातून नेहमी कारखान्याला मदत करण्याचे काम केले आहे. संस्था टिकली पाहिजे, ऊस उत्पादक सभासद व कामगारांना न्याय मिळाला पाहिजे, ही भूमिका घेतली आहे. कर्जाचे पुनर्गठन करून खा. सुजय विखे यांनी पुढाकार घेऊन संचालक मंडळाच्या सहकार्याने कारखाना सुरू केला. कारखाना बंद कसा पडला, सुरू कोणी केला, याचा विचार सर्वांनी केला पाहिजे. काही दिवसांपूर्वी कामगारांनी आपल्या प्रश्नांसाठी भूमिका घेतली. यामध्ये आम्हाला काही चूक वाटत नाही. चार वेळा बँकेच्या माध्यमातून निविदा प्रक्रिया राबविण्याचे काम झाले. परंतु यामध्ये कामगारांना दुर्लक्षित करून चालणार नाही, अशी अट घातली होती. त्यामुळे कोणी पुढे आले नाही. मागील वेळी कामगारांनी आंदोलन केले. त्यावेळी सुमारे ८.५० कोटी रुपये फंडाची रक्कम आपण बँकेच्या टॅगिंगमधून मिळवून देण्याचे काम केले, असे ते म्हणाले. यावेळी कामगारांनी खा. सुजय विखे व शिवाजी कर्डिले यांच्या पाठिशी असल्याचे सांगितले. यावेळी युनियनचे सचिव सचिन काळे, युनियनचे उपाध्यक्ष अर्जुन दुशिंग, कारभारी खुळे यांनी मनोगत व्यक्त करताना खा. सुजय विखे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

# सेवानिवृत्तीनंतरही कर्मचाऱ्यांशी कौटुंबिक बांधिलकी कौतुकास्पद - थोरात

**समाचार/नगर-दि.२४**



संपूर्ण देशातील सहकारासाठी मार्गदर्शक ठरलेल्या अमृत उद्योग समूहातील विविध सहकारी संस्थांमधील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीनंतरही एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होऊन हे नाते असेच कायम राहण्यासाठी, कर्मचाऱ्यांच्या सुविधेसाठी स्वतंत्र कार्यालय सुरू करण्यात आले आहे. तालुका व अमृत उद्योग समूह हा एक परिवार असून सेवानिवृत्तीनंतरही एकमेकांच्या सुखदुःखात सर्वजण सहभागी असणे ही कौतुकास्पद बाब असल्याचे प्रतिपादन आमदार बाळासाहेब थोरात यांनी केले.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर अमृत उद्योग समूहातील सेवानिवृत्त कर्मचारी संघाचे कार्यालय सुरू करण्यात आले यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी कारखान्याचे अध्यक्ष बाबासाहेब ओहोळ, इंद्रजीत थोरात, डॉ. जयश्री थोरात उपाध्यक्ष संतोष हासे, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, सर्व संचालक, भास्कर पानसरे व विविध संस्थांमधील सेवानिवृत्त कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार थोरात म्हणाले की, संगमनेर तालुका आणि अमृत उद्योग समूह एक परिवार आहे. सेवानिवृत्तीनंतर अनेक जणांच्या भेटी दुर्मिळ होतात मात्र परिवार म्हणून घट्ट नाळ असल्याने प्रत्येक जण एकमेकांच्या सुखदुः खात सहभागी होत असतात ही अत्यंत आनंददायी बाब आहे. सर्वांचा समन्वय व्हावा तसेच काही कर्मचाऱ्यांना आजारपणात मदत व्हावी याकरता हे कार्यालय नक्कीच काम करेल असा विश्वास कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी व्यक्त केला.

## विविध कार्यक्रमामुळे केडगाव भक्तिमय

# योगेश्वरी देवीचा पालखी सोहळा उत्साहात

**समाचार/नगर-दि.२४**

केडगावच्या वैष्णव नगर येथे योगेश्वरी देवीचा पालखी सोहळा उत्साहात संपन्न झाला. योगेश्वरी देवीचा नाम गजर व विविध अभंगांच्या ठेक्यावर ताल धरून नाचणारे भक्तगण,फुगड्या खेळणाऱ्या महिला,ठिकठिकाणी रांगोळी काढून व सडे शिंपडून परिसरातील रहिवाशांनी पालखीचे केलेले स्वागत अशा उत्साही वातावरणात दरवर्षी प्रमाणे चैत्र पौर्णिमेला होणारा योगेश्वरी देवीचा तीन दिवसीय उत्सव केडगावच्या वैष्णवनगर येथे उत्साहात पार पडला.



वैष्णव नगर मधील विश्वमाता गायत्री परिवार व जगदंबा सेवा मंडळ यांच्या वतीने चैत्र पौर्णिमेनिमित्त योगेश्वरी देवीच्या प्रतिवार्षिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. हे उत्सवाचे ३९ वे वर्ष होते. गायत्री शक्ती पीठ शांतिकुंज,हरिद्वार यांच्या प्रेरणेने मंगळवारी सकाळी नवकुंडी गायत्री यज्ञ करण्यात आला अशी माहिती चंद्रकांत देशमुख यांनी दिली.यावेळी त्यांनी गायत्री जपाचे महत्व विषद केले. सायंकाळी सहा वाजता मारुती मंदिरा पासून पादुकांची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. हनुमान सेवा मंडळाचे अध्यक्ष मुरलीधर बालवे यांच्या हस्ते पादुका पूजन करण्यात आले. यावेळी आमदार संग्राम जगताप तसेच सचिन कोतकर उपस्थित होते.यावेळी प्रसाद देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले. मिरवणुक व महाआरती नंतर भक्तांना महाप्रसदाचे वाटप करण्यात आले.मंगळवारी रात्रभर देवीचा जागर करण्यात आला.बुधवारी पहाटे या सोहळ्याची सांगता करण्यात आली.

## जनता महाविद्यालयातील कला व विज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांना निरोप

**समाचार/नगर-दि.२४**



अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, रुई छत्तीसी येथील जनता कला व विज्ञान महाविद्यालयात तृतीय वर्ष कला व विज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांना निरोप निमित्त कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोहर करांडे होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. डी. एस. तळुले, विज्ञान विभागप्रमुख प्रा. रवींराज सुपेकर, प्रा. नयना क्षीरसागर उपस्थित होते. प्रा. रवींराज सुपेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी तृतीय वर्ष विज्ञान विभागाच्या अस्मिता कुंभार व रोहिणी लोखंडे या विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतातून आपल्या महाविद्यालयातील अनुभव कथन केले. उपप्राचार्य डॉ. डी. एस. तळुले, प्रा. नदीम सय्यद व प्रा. किरण पाटोळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. मनोहर करांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत जीवनात यशस्वी होण्यासाठी कठिण परिश्रमाबरोबरच निरंतर नवनवीन बदल आत्मसात करणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी प्रा. राजेंद्र गोरे, प्रा. संदीप भणगे, डॉ. अनिल कोलते, प्रा. डी. बी. वाळके, प्रा. गणेश साठे, प्रा. के. एन. पाटोळे, डॉ. अर्चना आढाव, प्रा. मोहन पोटरे, प्रा. रेश्मा सोनावणे, प्रा. एस. आर. बोरुडे, प्रा. एस. बी. करांडे , प्रा. एन. एस. सय्यद , प्रा. एस. एस. नवले, प्रा. एस. ए. कोलते, प्रा. केशव निक्रड, प्रा. प्रियंका पठारे, प्रा. एस. आर. टकले, प्रा. आर. आर. साळवे, प्रा. व्ही. बी. खामकर, प्रा. ए. एस. धनवट, नीलेश खैरे, निर्मला म्हस्के, मुकुंद हराळ, महेश ठोंबरे, पांडुरंग गोरे उपस्थित होते. प्रा. एम. व्ही. रणसिंग यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रा. नयना क्षीरसागर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## जेएसएसच्या गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचे लेझीम पथक ठरले लक्षवेधी

# महावीर जयंतीनिमित्त केडगावमध्ये शोभायात्रा

**समाचार/नगर-दि.२४**

अहिंसा परमो धर्म:ची शिकवण देऊन संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाचा उपदेश करणारे भगवान महावीर स्वामींचा जन्मकल्याणक (जयंती) केडगावमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गुरुदेव युवा मंचच्या वतीने केडगाव परिसरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत जे.एस. एस. गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचे लेझीम पथक व सांस्कृतिक कार्यक्रमाने सर्वांचे लक्ष वेधले.शोभायात्रेत सनई, नगारा, चौघडा, बॅण्ड पथकासह डोक्यावर मंगल कलश घेतलेल्या मुली, विविध वेशभूषा परिधान केलेले लहान मुले-मुली, पांढरे शुभ्र वस्त्र परिधान केलेले पुरुष, केसरी, लाल साड्या परिधान केलेल्या महिला भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. या शोभायात्रेचे चौका-चौकात स्वागत करण्यात आले. शोभा यात्रेच्या अग्रभागी भगवान महावीर स्वामींची प्रतिमा असलेले रथ होते. विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने विविध डाव सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. भूषणनगर ताराबाग कॉलनी येथून शोभा यात्रेचे प्रारंभ झाले. नगर-पुणे रोड मार्गे केडगाव बस स्थानक, अंबिका बस स्थानक येथून मार्गक्रमण होऊन पाच गोडाऊन जवळील केडगाव जैन धर्मस्थानक येथे शोभा यात्रेचा समारोप झाला.



यावेळी साध्वी नवीन ज्योतीजी म.सा. यांनी भगवान महावीर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. मुलांनी नाटिकेतून भगवान महावीर यांनी मानव जातीच्या कल्याणासाठी दिलेली शिकवण सांगितली.

## सरस्वती हॉस्पिटलचा ७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

# आरोग्य सेवेचा नंदादीप सदैव तेवत राहील- डॉ. जाधव



**समाचार/नगर-दि.२४**

आई व बाळाची परिपूर्ण काळजी घेत आरोग्यसेवेत बांधिलकीचा नवा मापदंड निर्माण करणाऱ्या माळीवाडा येथील सरस्वती हॉस्पिटलचा ७वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. अमोल जाधव व डॉ. प्राजक्ता जाधव यांनी विश्वासार्हता, प्रामाणिकपणा आणि गुणवत्ता या त्रिसूत्रीमुळे आरोग्य क्षेत्रात सरस्वती हॉस्पिटलने ठसा उमटवला आहे. आरोग्य सेवेचा हा नंदादीप असाच तेवत राहील असा विश्वास यानिमित्त डॉ. जाधव यांनी व्यक्त केला आहे.

डॉ.जाधव यांनी सांगितले की, ७ वर्षांपूर्वी एक ध्येय समोर ठेवून सरस्वती हॉस्पिटलची मुहूर्तमेढ रोवली होती. या काळात नेहमीच सर्वोत्तम सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे. मोठ्या महानगरांमध्ये मिळणाऱ्या आरोग्य सुविधा नगरमध्ये तुलनेने कमी दरात उपलब्ध करून दिल्या. हॉस्पिटलच्या प्रवासात सुमारे ५ हजार डिलिव्हरी आणि १५ हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या आहेत. ६०० पेक्षा अधिक आरोग्य शिबिरे घेतली आहेत. प्रधानमंत्री सुरक्षा मातृत्व योजनेंतर्गत अनेक महिलांच्या मोफत तपासणी केल्या. याशिवाय महिला सक्षमीकरणासाठी जोडी तुझी माझी, दिल ये जिद्दी है, पत्र लेखन, प्रेगनन्सी फॅशन शो, अहमदनगर फॅशन शो असे अनेक उपक्रम राबवून महिलांना निखळ आनंद मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

रूग्णांवर उपचार करण्याबरोबरच त्यांना आनंदी जीवनाचा मंत्र देण्याचा प्रयत्न असतो. रूग्णांना उच्च दर्जाच्या सेवेची हमी देणारे नॅशनल क्रेडीशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स एण्ड हेल्थकेअर प्रोव्हायडर्स (एनएबीएच) या संस्थेचे मानांकन हॉस्पिटलला प्राप्त झाले आहे.

हॉस्पिटलमध्ये प्रसुती संबंधित लॅप्रोस्कोपीपासून सर्व अत्याधुनिक उपचार, तसेच समुपदेशन केले जाते. त्याचबरोबर विविध शाळा, कॉलेज, महिला संस्थांच्या माध्यमातून डॉ. जाधव आरोग्याचा व महिला सक्षमीकरणाचा मंत्र देत असतात. स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. प्राजक्ता जाधव यांनी वंध्यत्व निवारणावर विशेष अनुभव मिळवला असून अशा दाम्पत्यांसाठी सरस्वती हॉस्पिटलमध्ये आवश्यक तपासण्या, समुपदेशनाची विशेष सुविधा उपलब्ध आहे.

आरोग्यसत्ताक चळवळीतून त्यांनी संपूर्ण नगर शहर निरोगी, आरोग्यसंपन्न आणि आनंदी राहिल यादृष्टीने महत्वाचे पाउल उचलले आहे.

सातवा वर्धापन दिन साजरा करताना हॉस्पिटलने यंदा मतदार जागृती अभियान सुरु केले आहे. देशभरात सध्या लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरु आहे. लोकशाहीचा हा सर्वात मोठा उत्सव आहे. मतदान हा केवळ अधिकार नसून कर्तव्य आहे. हे कर्तव्य प्रत्येकानेच बजावले पाहिजे. यासाठी हॉस्पिटल नगरमध्ये जागृती करून मतदानाचा टक्का वाढविण्याच्या प्रक्रियेत योगदान देत असल्याचे डॉ.जाधव यांनी सांगितले.

# नॉर्थस्टार ग्लोबल शाळेत सैनिकी प्रशिक्षणावर भर

**समाचार/नगर-दि.२४**

महाराष्ट्र इन्स्टीटच्यूट एज्युकेशन अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट, पुणे संचलित असणाऱ्या नॉर्थस्टार ग्लोबल अ‍ॅकॅडमी अँड न्यू होरायझन कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांना सैनिकी प्रशिक्षण व खेळावर विशेष भर दिला जाणार असल्याची माहिती संचालिका छाया खर्डे यांनी दिली.

संस्थेमध्ये भारतीय वायूसेनेतील माजी शिक्षण अधिकारी मानसिंग पाटील आणि बालशिक्षण तज्ज्ञ मिरा पाटील रुजू झाले आहेत. दोघांनाही या क्षेत्रातील जवळपास ४७ वर्षांचा अनुभव आहे.

संस्थेत झालेल्या कार्यक्रम संचालिका छाया खर्डे व प्राचार्य पंकज मालेगावकर यांनी पाटील उभयतांचे स्वागत केले. यावेळी बोलताना मानसिंग पाटील म्हणाले, आगामी काळात नियमित अभ्यासक्रमाबरोबर सैनिकी प्रशिक्षण आणि खेळाडूंवर विशेष भर देण्यात येणार आहे. शाळेतून राष्ट्रीय खेळाडू तयार करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, मानसिक आणि भावनिक विकासावर देखील भर दिला जाईल.






# के.जी. महाविद्यालयात पुस्तक दिन साजरा

**समाचार/नगर-दि.२४**

के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात जागतिक पुस्तक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घान संस्थेचे विश्वस्त संचालक मा. श्री. किशोरजी मुनोत यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पुस्तक वाचन ही एक चांगली सवय आहे . वाचनाने आपल्या ज्ञानात वाढ होते असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले .तर महाविद्यालयाच्या परिसर संचालिका डॉ.स्वाती मुनोत यांनी जागतिक पुस्तक दिनानिमित्त आपण त्या महान व्यक्तींचे स्मरण करतो ज्यांनी आपल्या लेखनातून जगाला एक नवा मार्ग दाखवला आहे असे प्रतिपादन केले.

याप्रसंगी ग्रंथपाल सौ. हर्षाली रासकर यांनी पुस्तक दिनाविषयी आपले मत व्यक्त केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सविता चव्हाण यांनी केले तर आभार डॉ. वर्षा कीर्तने यांनी मानले. याप्रसंगी डॉ.प्रशांत खोपटीकर, डॉ. स्नेहल बोरावके, प्रा.आरती खेडकर, श्री संतोष मुनोत व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हिवरे बाजार येथे श्रीराम कथा ज्ञान यज्ञाचा समारोप

# श्रीरामांची कथा ही कामाची आणि काम नावाच्या विकाराच्या विनाशाची- शर्मा



**समाचार/नगर-दि.२४**

प्रभू श्रीरामाची कथा ही कथा आहे. ही कथा आपल्या सगळ्यांच्या कामाची आहे आणि कामाच्या विनाशाची आहे. विकासाची नाही. काम नावाच्या विकाराचा विनाश हा राम कथेच्या श्रवणाने होतो माणूस हळूहळू राम होत जातो, असे प्रतिपादन हरिभक्त परायण समाधान महाराज शर्मा यांनी आदर्श गाव हिवरेबाजार येथे सुरू. असलेल्या श्री राम कथेच्या सांगते प्रसंगी केले.

नगर तालुक्यातील आदर्श गाव हिवरेबाजार येथे श्रीराम नवमीच्या आदल्या दिवसापासून हनुमान जयंती पर्यंत श्री राम कथा ज्ञान यज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कथाकथनकार हरिभक्त पारायण समाधान महाराज शर्मा होते कथेच्या शेवटच्या दिवशी त्यांनी रावण वधाचे चित्र भाविकांसमोर उभे केले.

समाधान महाराज म्हणाले की, प्रभू श्रीराम कथेचा श्रवण आपल्याला विषाद मुक्ती, विचारमुक्ती, विलासिता मुक्ती, विपरीत भावापासून मुक्ती होऊन जाते. राम मर्यादा पुरुषोत्तम आहे. विज्ञानाचा एक नियम आहे एका ठिकाणी एकच वस्तू बसते. अगोदर जर त्या ठिकाणी कोणी असेल तर दुसरी वस्तू बसू शकत नाही मग हृदयामध्ये जर प्रपंच असेल तर तेथे देव बसत नाहीत. आणि तिथे देव बसला तर पुन्हा प्रपंच राहत नाही. तुम्हाला काय पाहिजे.

यावेळी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, नोबल हॉस्पिटलचे संचालक डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. श्री. व सौ. हर्षवर्धन तनवर, सैनिक कल्याण अधिकारी विद्यासागर कोरडे, सहाय्यक अधिकारी चित्र सेन, जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, उपशिक्षणाधिकारी दिघे, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे उप अभियंता जगदीश काळे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.


**विकणे आहे**

गुलमोहर रोड येथील रोड टच पहिल्या मजल्यावरील १000 स्क्वे. फुटाची वेलफर्निश्ड ऑफिस स्पेस विकणे आहे.

-: संपर्क :-
9011923939

**विकणे आहे**

चालू स्थितीतील जिम साहित्य त्वरित विकणे आहे.

- संपर्क -
9834448462
9175075992

**भाड्याने देणे**

कोहिनूर प्लाझा सावेडीमधील ग्राऊंड फ्लोअरवरील ३७० स्क्वेअर फुटाचे ऑफिस (केबिन, वेटिंग, रिसेप्शन विथ फर्निचर, एसीसह) भाड्याने देणे आहे. (कालिका)

* संपर्क *
9881141240

देशात सर्वाधिक विक्री होणारे व्ही गार्ड सोलार वॉटर हिटर

V-GUARD Solar Water Heater

- अधिकृत विक्रेते -
प्रोप्रा. मिलिंद गंधे

SS 304 L टँक
60 LS 5000 LPD

आदित्य एन्टरप्रायजेस्
गुलमोहोर रोड, सावेडी, अ. नगर.
9325103781

**जाहीर नोटीस**

घ. नं. ७१८/भिंगार/२०२४-२५
छावनी परिषद कार्यालय, अहमदनगर
दिनांक : २३/०४/२०२४


या नोटिसीद्वारे जाहीर करण्यात येते की, १) श्री. सुभाष विश्वनाथ उलाने, वय : ६२ वर्षे, २) श्री. सुनील विश्वनाथ उलाने, वय : ५४ वर्षे, दोघेही राहणार घर नं. ७१८, माळगल्ली, भिंगार, अहमदनगर यांनी घर नं. ७१८, भिंगार सर्व्हे नं. २११-५६२, भिंगार, अहमदनगर छावनी परिषद हे कायदेशीर वारस प्रमाणपत्र सिव्हिल एम. ए. ३३७/२०२३ दि. ०३/११/२०२३ च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रितसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत. सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षीस, खरेदी हक्क, हितसंबंध असेल वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांच्या आत सबळ कागदपत्रांच्या पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी छावनी परिषद, अहमदनगर यांच्याकडे तसे लेखी कळवावे.

सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

घर नं. ७१८, भिंगार
क्षेत्रफळ : १२३६.०० चौ. फू.

सौ. एस. एम. पारनाईक
कार्यालय अधीक्षक
कृते मुख्य अधिशासी अधिकारी,
अहमदनगर छावनी परिषद
(विक्रांत मोरे)

**SASE DCORATERS**



Mandap, Light & Flower Decoraters

Add. Katvan Khandoba Road, Ahmednagar
9822331006, 9579544110

शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकामाची रांगोळी

डागा
शांतीलाल डागा
दाळमंडई/मार्केट यार्ड, अहमदनगर.
फोन नं. ७५८८११५१५७, ९८२२०८१४४०

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात
दिनांक - १९ एप्रिल ते २५ एप्रिल २०२४



| | |
|---|---|
| बडे मियाँ छोटे मियाँ | 8.00 AM<br>11.10 AM<br>02.15 PM<br>07.00 PM<br>11.00 PM |
| मैदान | 8.30 AM,12.00 PM<br>6.45 PM,10.15 PM |
| स्वातंत्र्यवीर सावरकर | 03.25 PM |
| GODZILLA X KONG | 5.30 PM |
| CREW | 01.25 PM<br>10.30 PM |
| राजकारण गेलं मिशीत | 04.00 PM |
| द लिगसी ऑफ जिनेश्वर | 10.00 AM<br>07.40 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher * - Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show
CONNPLEX
AVAILABLE ON book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

Milk & Cream
Icecream Product




प्रोप्रा : किशोर मुदगल
डी-१२, एमआयडीसी अहमदनगर 7219515144